बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४२ | बुधवार, दि.२५ सप्टेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजणार

### शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी सायं. ४:३० वा. आयोगाची होणार पत्रकार परिषद





**मुंबई :-** लोकसभा निवडणुकांनंतर आता राज्यातील राजकारण्यांप्रमाणे राज्यातील जनतेलाही निवडणुकांचे वेध लागले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील राजकारणात विविध घडामोडी घडताना दिसत आहे. दरम्यान शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४:३० वाजता निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद होणार आहे या पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

एकीकडे पक्षांमध्ये जागावाटप, मुख्यमंत्रिपद याबद्दल चर्चा सुरु असताना दुसरीकडे सत्ताधारी विरोधकामध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कधी जाहीर होणार, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. अखेर आता याबद्दलची मोठी माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाची टीम महाराष्ट्रात येणार आहे. येत्या २६ सप्टेंबरपासून केंद्रीय निवडणूक आयोगाची टीम चार दिवस महाराष्ट्राचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयोगाची टीम विधानसभा निवडणुकीबाबत माहिती घेणार आहे. तसेच राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबतही चर्चा केली जाणार आहे.

राज्यातील विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्राचा दौरा आयोजित केला आहे. येत्या २६, २७ आणि २८ सप्टेंबरला निवडणूक आयोगाचे अधिकारी मुंबई दौऱ्यावर असणार आहेत. येत्या गुरुवारी २६ सप्टेंबरला केंद्रीय निवडणूक आयोगाचे अधिकारी दिल्लीहून मुंबईत येतील. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी २७ सप्टेंबरला सकाळी १० वाजता सर्व राजकीय पक्षांसोबत बैठक होईल. यानंतर त्याच दिवशी दुपारी १ वाजता सीईओ, नोडल अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाईल. यापाठोपाठ दुपारी ३ वाजता निमलष्करी दलाचे अधिकारी, आयकर विभाग, गुप्तचर यंत्रणा, सीबीआय, ईडी अधिकाऱ्यांबरोबर बैठक होईल. तसेच शुक्रवारी संध्याकाळी ५ च्या सुमारास मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांच्यासह प्रशासकीय आणि पोलिस यंत्रणेतील अधिका?यांशी महत्त्वाच्या बैठका होतील. या सर्व बैठकींमध्ये राज्याची सध्याची परिस्थिती आणि विधानसभा निवडणूक याबद्दलचा आढावा घेतला जाईल.

यावेळी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी किती पोषक वातावरण आहे, याबद्दलची माहिती जाणून घेईल. त्यानंतर शनिवारी २८ सप्टेंबरला सकाळी ९. ३० वाजता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिक्षकांची बैठक होणार आहे. यानंतर दुपारी ४. ३० वाजता निवडणूक आयोगाचे अधिकारी पत्रकार परिषद घेतील. या पत्रकार परिषेदनंतर निवडणूक आयोगाचे अधिकारी दिल्लीकडे रवाना होतील, अशी माहिती समोर आली आहे.



By e-mail/Speed Post

ELECTION COMMISSION OF INDIA
Nirvachan Sadan, Ashoka Road, New Delhi – 110 001

No. 464/MH-LA/2024/WS-II    Dated: 20th September, 2024

To

The Chief Electoral Officer
Maharashtra,
Mumbai.

Subject:- General Election to the Legislative Assembly of Maharashtra, 2024- visit of Hon'ble Commission to review the poll preparedness in the State- regarding

Sir,

I am directed to state that the Hon'ble Commission will be visiting Mumbai to review the poll preparedness of General Election to the Legislative Assembly of the State of Maharashtra from 26th to 28th September, 2024 and has approved the following programme:-

Day 1: 26th September 2024 (Thursday)

| | | |
|---|---|---|
| Dep. 05:50 PM<br>Arr. 08:00 PM | New Delhi<br>Mumbai | By Vistara<br>UK-955 |
| Night Stay at Mumbai | | |

Day 2: 27th September 2024 (Friday)

| | | |
|---|---|---|
| 10:00 AM | Meeting with Political Parties | Venue:- Mumbai |
| 1:00 PM | Meeting with CEO, SPNO and Nodal Officer, CPMF | |
| 3:00 PM | Meeting with Enforcement agencies | |
| 5:00 PM | Meeting with CS, DG and other Administrative Secretaries/ Sr. Police Officers | |
| Night Stay at Mumbai | | |

Day 3: 28th September 2024 (Saturday)

| | | |
|---|---|---|
| 09:30 AM | Meeting with DCs and SPs | Venue:- Mumbai |
| 04:30 PM | Press Conference | |
| Dep. 07:10 PM<br>Arr. 09:15 PM | Mumbai<br>New Delhi | By Vistara<br>UK- 938 |

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून दोन दिवस मॅरेथॉन बैठका घेतल्यानंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची घोषणा केली जाईल, असं बोललं जात आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांचा हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणूक जाहीर होऊ शकते, अशीही चर्चा सध्या रंगली आहे.

विशेष म्हणजे येत्या ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यात आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र ाबरोबर झारखंड विधानसभेची निवडणूक होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची घोषणा कधी होते, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करा,प्रधानसचिवांना जि.प.अध्यक्षांचे पत्र

**गोंदिया**–जिल्हा परिषदेला मिनी मंत्रालय मानले जाते.ग्रामीण भागातील ग्रामविकासाची कामे ही जिल्हा परिषदेतंर्गत होत असल्याने राज्यसरकारच्या विविध विभागांशी संवाद होऊन राज्यस्तर विभागाची माहिती जिल्हा परिषदेला प्राप्त व्हावी याकरीता सर्वसाधारण सभेसह स्थायी समितीच्या सभेला अधिकार्यांना आमंत्रित केले जाते.मात्रे गेल्या अडीच वर्षात सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१(रोहयो) व सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ च्या कार्यकारी अभियंत्यानी जिल्हा परिषदेच्या या दोन्ही सभांना दांडी मारत आपले प्रतिनिधी न पाठविल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावे या आशयाचे पत्र जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी राज्याच्या प्रधानसचिवांना व बांधकाम विभागाच्या सचिवांना पाठविले आहे.अध्यक्ष रहागंडाले यांनी पाठवलेल्य पत्रात अनेकदा संबधित कार्यकारी अभियंत्याना सभेचे पत्र दिल्यानंतरही गैरहजर राहिल्याने रस्ता बांधकामातील अनेक समस्या सोडविण्यात अडचणी निर्माण झाल्याचे म्हटले आहे.

## काँग्रेसने केला पुन्हा चारही विधानसभा मतदारसंघावर दावा

### आढावा बैठकीत पदाधिकाऱ्यांनी ठेवला मुद्दा, प्रभारींनी जाणून घेतले मत

**गोंदिया:** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसची विभागीय आढावा बैठक सोमवारी (दि.२३) चंद्रपूर येथे पार पडली.या बैठकीला गोंदिया जिल्ह्यातील पदाधिकारीसुद्धा उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी चारही विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा उमेदवार देण्यात यावा असा आग्रह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमोर लावून धरल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

चंद्रपूर येथे सोमवारी काँग्रेसची नागपूर विभागीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार व खासदार, आमदार व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी वरिष्ठ नेत्यांनी जिल्हानिहाय आढावा घेतला. तसेच कोणत्या विधानसभा मतदारसंघात नेमकी काय परिस्थिती आहे हे जाणून घेतले. या बैठकीला गोंदिया जिल्ह्यातून आ.सहषराम कोरोटे, जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, प्रदेश सचिव व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड व




पदाधिकाऱ्यांनी गोंदिया जिल्ह्यातील चारही मतदारसंघात काँग्रेससाठी अनुकूल वातावरण आहे.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराला मतदारसंघ मिळालेले मताधिक्य, कोणत्या मतदारसंघात कशी अनुकूल परिस्थिती आहे. त्यामागील नेमकी कारणे काय हे महाराष्ट्र प्रभारी चेन्नीथला व प्रदेशाध्यक्षांसमोर मांडली. तसेच चारही मतदारसंघातून काँग्रेसकडून लढण्यास तगडे उमेदवार आहेत. पक्षाने इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. त्यालासुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला.

लोकसभेनंतरही जिल्ह्यात महायुती सरकार विरुद्ध वातावरण आहे. या वातावरणाचा फायदा काँग्रेसला निश्चितच मिळू शकेल.

### तयारीला लागा जागांचे पाहू

**आढावा बैठकीत जिल्ह्यातील चारही जागांवर काँग्रेसचा उमेदवार देण्याची मागणी केल्यानंतर वरिष्ठ नेत्यांनी आधी तुम्ही जोमाने तयारीला लागा, जागांचे आम्ही पाहतो. निश्चितच तुमची निराशा होऊ देणार नाही. असा शब्द जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांना दिल्याचे बैठकीला उपस्थित असलेल्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले.**

### जागांवरुन वाढणार तिढा

**जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघापैकी तिरोडा, अर्जुनी मोरगाव या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने, तर गोंदिया विधानसभा मतदारसंघावर उध्दवसेनेने दावा केला आहे. त्यातच आता काँग्रेसने आढावा बैठकीत चारही मतदारसंघावर दावा केल्याने जागांवरुन महाविकास आघाडीतील तिढा वाढण्याची शक्यता आहे.**

त्यासाठी चार मतदारसंघातून काँग्रेसचा उमेदवार द्यावा असा आग्रह पदाधिकाऱ्यांनी बैठकीत लावून धरल्याची माहिती आहे.

दरम्यान काँग्रेसच्या या दाव्याने महाविकास आघाडीचे मित्र पक्ष असलेल्या उध्दवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये खदखद सुरु झाली आहे. त्यामुळे निवडणुकांपुर्वीच यात मिठाचा खडा पडतोय काय, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

## वर्चस्वाच्या झुंजीत टी ९ वाघासह टी ४ च्या बछड्याचा मृत्यू

### नवीन वाघाचा एनएनटीआर मध्ये प्रवेश

### पंचासमक्ष उत्तरीय तपासणी

**पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे चमुद्वारे समिती सदस्यांचे उपस्थितीत मृत वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले व वाघाचे व्हिसेरा सॅम्पल उत्तरीय तपासणी करीता संकलित करण्यात आले आहेत.**



**गोंदिया :** नागझिरा अभयारण्यात सलग दुस?या दिवशी आणखी एका वाघाचा मृतदेह आढळल्याने नागझिरा प्रशासन हादरले आहे. नागझिराचा राजा अशी ओळख असणारा "टी-९' हा वाघ रविवारला मृतावस्थेत सापडला होता. तर सोमवारला सकाळी "टी-४'या वाघिणीचा बछडा मृतावस्थेत सापडल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, वर्चस्वाच्या झुंजीत दोन दिवसात दोन वाघांचा मृत्यू झाल्याने नागझिऱ्याच्या जंगलात आता वाघांचा रक्तरंजित खेळ सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात दोन वाघांमध्ये झालेल्या झुंजीत टी-९ या वाघाचा मृत्यू झाल्याची घटना २२ सप्टेंबर रोजी नागझिरा -१ कक्ष क्रमांक ९६ मध्ये मंगेझरी रोड नागदेव पहाडी परिसरात सकाळच्या सुमारास उघडकीस आली होती.तर थाडेझरी परिसरातील कक्ष क्र.९९ मध्ये गस्तीवरील कर्मचाऱ्याला एक नर बछड्ा मृतावस्थेत आढळून आला.सदर बछडा हा टी ४ या वाघीणीचा असल्याचे निष्पन्न झाले असून टी ४ वाघीणीने आपल्या तीन बछड्यासह पर्यटकांना भुरळ घातली होती.

सदर वाघांच्या मृत्यूची तपासणी करतांना धस्टपुष्ट असलेल्या एका नव्या वाघाचा प्रवेश या क्षेत्रात झाल्याचे दिसून आले.

वन विभाग व वन्यजीव विभागाकडून शिकारीच्या घटनांवर अंकुश लावण्यात आल्यानंतर वन्यप्राण्याच्या संख्येत वाढ झाली आहे. गेल्या दहा वर्षांचा आलेख पाहता गोंदिया व भंडारा जिल्ह्यात वाघांची संख्या वाढल्याचे दिसून आले आहे. वाघांच्या अधिवासासाठी प्रादेशिक आणि वन्यजीव जंगलांमधील पोषक वातावरण असल्यामुळे गोंदिया-भंडारा जिल्ह्यात वाघांची संख्या आता वाढत असल्याचे शुभ संकेत मिळत असताना जिल्ह्याच्या चौफेर वाघांचा अधिवास आहे.

विशेष म्हणजे, गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील जंगल हा मध्य भारतातील व्याघ्र प्रकल्पांना जोडणारा दुवा आहे. ज्यामध्ये नागझिरा ते पेंच, नागझिरा नवेगाव- ताडोबा, नागझिरा-उमरेड, पवनी, कऱ्हांडला अभयारण्य असा एक कॉरिडोर आहे. त्यामुळे वनपरिसरात हमखास वन्यप्राण्यांचा संचार दिसून येत असतानाच वाघाचाही हा भ्रमणमार्ग आहे.

मागील २०२२ च्या गणनेनुसार नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात जवळपास २२ वाघ असल्याचे अंदाज असून यात ३ नर व ७ मादा वाघिणीसह अडीच ते तीन वर्षीय दोन वाघ व छाव्यांचा समावेश आहे. त्यातच आता चंद्रपूर जिल्ह्यातील तीन वाघिणींना नवेगाव नागझिऱ्यात सोडण्यात आल्याने वाघाच्या संख्येत कमालीची वाढ झाली आहे. दरम्यान, आपल्या अस्तित्वासाठी या वाघांची झुंज सुरू झाल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे.

रविवारी वनपरिक्षेत्र नागझिरा अभयारण्याअंतर्गत सहवन-क्षेत्र नागझिरा संकुल, नियत क्षेत्र नागझिरा १, कक्ष क्र. ९६ मधील मंगेझरी रोड नागदेव पहाडी परिसरात बिटरक्षक जे. एस. केंद्र, नागझिरा १ हे आपल्या चमुसह नियमीत गस्तीवर असताना साधारणतः सकाळी १० वाजताच्या सुमारास एक नर वाघ अंदाजे वय वर्षे ९ ते १० मृतावस्थेत दिसून आला.

या घटनेबाबतची माहिती बिटरक्षक केंद्रे यांनी तत्काळ वरिष्ठ वनअधिकारी यांना कळविली.



घटनेची माहिती प्राप्त होताच नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक जयरामे गौडा आर., नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोलीचे उपसंचालक राहुल गवई, सहाय्यक वनसंरक्षक, (अति.कार्य.) एम.एस.चव्हाण, वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही.एम. भोसले, घटनास्थळी दाखल झाले. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या प्रमाणभुत कार्यपद्धतीनुसार गठीत समितीद्वारे घटनास्थळ परिसराची व मृत वाघाची पाहणी करण्यात आली.

सदर समितीमध्ये यावेळी मानद वन्यजीव रक्षक तथा प्रतिनिधी मुख्य वन्यजीव रक्षक सावन बहेकार, एनटीसीए प्रतिनिधी रुपेश निंबार्ते, एनजीओ प्रतिनिधी छत्रपाल चौधरी, डॉ शितल वानखेडे, डॉ. सौरभ कवठे, डॉ. समिर शेंद्रे, डॉ. उज्वल बावनथडे, पशुवैद्यकिय अधिकारी यांचा समावेश होता. पुढील तपास नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे उपसंचालक राहुल गवई, यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही. एम. भोसले करीत आहेत.

## राज्यस्तरीय प्रथम पुरस्काराने सिरेगावबांध ग्रा.पं.सम्मानित

### अधिकारी व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती, २५ वर्षात प्रथमच मिळाला बहुमान



**गोंदिया:** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०१८-१९ अंतर्गत राबविण्यात आलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेच्या राज्यस्तरीय प्रथम पुरस्कारासाठी जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध ग्रामपंचायत पात्र ठरली होती. याचा पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी (दि.२३) छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला. सिरेगावबांध ग्रामपंचायच्या पदाधिकाऱ्यांना धनादेश, सम्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी अल्पसंख्याक व पणनमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माणमंत्री अतुल सावे, खा.भागवत कराड, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, अभियान संचालक शेखर राउंदल आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारताना पंचायत समिती सभापती,उपसभापतीसह जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर,पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुकाअ आनंदराव पिंगळे, सरपंच शंतकर वैद्य, सविताताई कोडापे, भागचंद रहांगडाले, विस्तार अधिकारी अनिल राणे, पुष्पलता दुरुगकर, माजी सरपंच इंजि.हेमकृष्ण संग्रामे, ललीत बंसोड, यशवंत कुंभरे, गणेश मरसकोल्हे, विनिता खोब्रागडे, छाया गहाणे, श्यामराव उके,मनराज कचारे,सागर चिमणकर, ललीता संग्रामे, हेमराज अंबुले, सौरभ अग्रवाल उपस्थित होते.

## अपक्ष आमदाराला पक्षात घेण्यासाठी भाजपचे "घालीन लोटांगण"!

**खेमेंद्र कटरे/गोंदिया** – महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या असून सर्वच पक्षांनी आपल्या पक्ष बांधणीसह संभाव्य उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश दिल्याचे पहावयास मिळत आहे. मात्र गोंदिया विधानसभेत भाजपचे मात्र चित्र वेगळे असून या मतदारसंघात अपक्ष आमदाराला भाजपमध्ये आणण्यासाठी मागील तीन महिन्यांपासून प्रयत्न चालू आहेत.विशेष म्हणजे यावेळी बहुजन समाजातील उमेदवार देण्याची मागणी मतदारसंघात असतानाही नागपूरचे स्वघोषित ओबीसी नेते मात्र त्याला आडकाठी आणून अपक्ष आमदाराला भाजप मध्ये आणण्यासाठी सर्वात मोठ्या राष्ट्रीय पक्षाला "घालीन लोटांगण" करावे लागत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

राज्यात मागील चार वर्षात ज्या काही नाट्यमय घडामोडी घडल्या त्याचप्रमाणे गोंदिया विधानसभेत ही घडल्याचे पहावयास मिळत आहे. २०१९ विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी पक्षाला राम राम ठोकत भाजप मध्ये प्रवेश केला. त्यामुळे भाजप मधून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्या विनोद अग्रवाल यांनी 'मेरा क्या कसूर' म्हणत अपक्ष भाजप विरोधात निवडणूक लढवीत भाजप उमेदवाराचा पराभव केला.त्यानंतर त्यांनी निवडणूक जिंकताच भाजपला समर्थन दिले.

मात्र भाजप-शिवसेनेचा काडीमोड होऊन नवीन महविकास आघाडीची सत्ता आल्यावर त्या सरकारला ही त्यांनी पाठिंबा दिला.त्यावेळी राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेलांना मी आपलाच असल्याचे सांगितले.अडीच वर्षांनी महविकास आघाडीची सत्ता गेली व एकनाथ शिंदेच्या नेतृत्वात महायुतीची सत्ता आल्यानंतर त्यांनी पुन्हा महायुतीला पाठिंबा देत आपली कामे करवून घेतली.त्यांनी भाजप विरोधात जिल्हा परिषद,पंचायत समिती व बाजार समितीच्या निवडणुका लढवीत आपली संघटना बळकट केली.

त्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीत मात्र भाजप उमेदवाराचा प्रचार करीत आपण भाजपचेच असल्याचे चित्र निर्माण केले.त्याकरीता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा आयोजित करुन आपल्या कार्यकर्त्यांना आपणच सर्व या सभेचे नियोजन केल्याचे सांगितले असले तरी भाजपनेच त्या प्रचारसभेकरीता रसद पुरवली हे भाजपचे नेते मात्र सांगायला मागे पुढे बघत नाहीत.

त्या निवडणुकापासूनच गोपालदास अग्रवाल हे घरवापसीच्या तयारीला लागले होते.तेव्हा ते गेले की आपण भाजपचेच असल्याने आपण येणार अशी भूमिका भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडे अपक्ष आमदारांनी व्यक्त केली होती.त्यानंतर गेल्या काही दिवसापुर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांनी आपण महायुतीत सेनेकडे गोंदियाची जागा मागा मी आपल्या पक्षाकडून लढणार अशीही चर्चा रात्रीच्या वेळी बंद खोलीत केल्याचे बोलले जात असून त्या चर्चेच्या दिवशीच अचानक उपमुख्यमंत्री फडणवीस हे मुख्यमंत्र्याच्या निवासस्थानी पोचताच अपक्ष आमदार मात्र त्यांना सामोरे न जाताच निघून गेल्याची चर्चा शिंदे सेनेच्या गटाकडून ऐकावयास मिळतेय,त्यात किती सत्यता हे त्यांनाच ठाऊक.विशेष म्हणजे गोपालदास अग्रवाल काँग्रेसमध्ये गेल्यानंतरही विनोद अग्रवाल यांनी मतदारसंघात सपर्क यात्रा काढून आपल्या चाबी संघटनेत कार्यकर्त्यांचा व पदाधिकारी यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम सुरु ठेवल्याने सुध्दा भाजपच्या नेत्यासंह कार्यकर्त्यामध्ये नाराजीचा सूर दिसून आला.

असे असले तरी मात्र मागील काही महिन्यांपासून भाजपच्या नागपूर येथील एका नेत्याच्या मध्यस्थीने त्यांना भाजपात आणण्याचे प्रयत्न केले जात असताना व पुर्ण मदत केली जात असल्याने माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी भाजपच्या वरिष्ठांकडे नाराजी व्यक्त करीत आता आपणास काँग्रेसमध्ये घरवापसीशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले.त्यानंतर त्यांनी ८ सप्टेंबरला अधिकृत काँग्रेस प्रवेशाची घोषणा करीत १३ सप्टेंबरला काँग्रेसमध्ये घरवापसी केली.

त्यातच काही महिन्यांपासून अपक्ष आमदार असलेले विनोद अग्रवाल यांना भाजपात आणण्यासाठी प्रयत्न होत असताना मात्र गोंदियात बहुजन समाजाला नेतृत्व देण्याची मागणी जोर धरू लागली.त्यासंबधीचे निवेदन सुध्दा गोंदिया जिल्हा प्रभारी यांना गोंदियातील ओबीसी बहुजन नेत्याने दिले.त्यात गोंदियात भाजपने बहुजन समाजातील कोणालाही उमेदवारी दिली तर निवडणूक जिंकण्यास भाजप सक्षम असल्याचे सांगत आम्ही सर्व एकत्र राहू अशी ग्वाहीही दिली.असे असताना मात्र नागपूरचे ओबीसी नेते गोंदिया मतदारसंघात ओबीसी बहुजन समाजाला उमेदवारी देण्यासाठी विरोध कसे काय करू शकतात,हे न उलगडणारे कोडेच आहे.

विशेष म्हणजे भाजप हा सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचे सांगतो. असे असताना सर्वात मोठ्या राजकीय पक्षाला मात्र अपक्ष आमदाराला पक्षात घेण्यासाठी "घालीन लोटांगण" करावे लागत असेल तर याला काय म्हणावे? असा प्रश्न भाजपच्या कार्यकर्त्यांना पडला आहे.यासाठी अपक्ष आमदारांनी भाजप मध्ये येण्यास काही महिण्याआधी नकारही कळविला होता,अशी चर्चा आहे.त्यामुळे भाजप बहुजन उमेदवाराला उमेदवारी देऊन निवडून आणू शकत होता.

मात्र बहुजन नेतृत्व संपविण्याचेच काम भाजपमधील बहुजन नेतेच करीत असल्याचे दिसून येत आहे.विशेष म्हणजे मागील काही दिवसापूर्वी अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतल्यानंतर त्यांचा पक्ष प्रवेश पितृपक्ष पंधरवडा संपल्यानंतर ३ ऑक्टोबरला होत असल्याची चर्चा आहे.गोंदिया विधानसभेत यावेळी भाजपला चांगली संधी असताना व बहुजन समाजातील चेहरेही भाजपकडे अशताना भाजप मात्र अपक्ष आमदाराला पक्षात आणण्यासाठी "घालीन लोटांगण" करीत असल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर पहावयास मिळत आहे.

## संपादकीय

# सत्यशोधक चळवळीची भूमिका?

महापुरुषांचे जीवनचरित्रे समाजमनाला सुसंस्कारित करून जात असतात. आपल्या पारंपारीक विचारांचा परीघ बदलवून नवीन विचारांच्या आवर्तनात नेण्याचं सर्वोत्तम कार्य महापुरुषांचे चरित्र करीत असतात. ते जसे बोधप्रद असतात तसेच कालदर्शीही असतात. ते जसे विचारांची रुजवणूक करतात तसेच आपल्या जगण्याच्या वाटाही प्रशस्त करून जातात.

तथागत बुद्ध, संत कबीर आणि महात्मा फ्फुले यांच्या पुरोगामी काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहास विसरून इतिहास घडविता येत नाही, हे ध्येय उराशी बाळगून 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा सर्वोत्तम ग्रंथ लिहून बुद्धाच्या जीवनचरित्राची नव्याने मांडणी केली आहे. बुध्दांप्रमाणेच त्यांचेवर कबीरांच्या विचारांचाही मोठा प्रभाव होता .

कबीरांबद्दल बोलताना बाबासाहेब म्हणतात, 'माझे दुसरे गुरू कबीर होय. माझे वडील कबीरपंथी होते. त्यामुळे कबीरांच्या जीवनाचा आणि तत्त्वांचाही माझ्यावर फ्फार मोठा परिणाम झाला. माझ्या मताप्रमाणे, कबीराला बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे खरे रहस्य कळले होते. मी कोणालाच मोठे म्हटले नाही. गांधीना मी ममहात्मा' म्हटले नाही. कारण कबीरांनी म्हटले आहे.

'मनुष्य होना कठीण है । तो साधू क्यों बने ? जो व्यक्ती माणूस होऊ शकला नाही, तो महात्मा कसा होईल? परंतु राष्ट्रपिता फ्फुले मात्र माणूस व महात्मा या दोन्ही गोष्टीस पात्र होऊन समाज सुधारणेस कारणीभूत ठरलेत. आणि म्हणून बाबासाहेबांनी त्यांना आपले गुरु मानून त्यांच्या मानवतावादी विचारांना घटनात्मक चौकटीत बध्द केले .

सप्टेंबर २४, १८७३ रोजी महात्मा फ्फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. यनिर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठीफ हा विचार फ्फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक हा शब्द वापरला, त्यावरून सत्यशोधक समाज व अर्थातच महात्मा जोतिबा फ्फुले आस्तिक होते, हे स्पष्ट होते. महात्मा फुले यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहून झाल्यानंतर महाराष्ट्रात पंतोजी व शेटजींच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला. जोतिबा फुले हे क्रांतिकारी नेते असल्याने त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान व व्यासपीठ निर्माण करणे त्यांना अत्यंत गरजेचे वाटले. यातूनच सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली. सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान मानताना एकेश्वरवाद ईश्वर भक्ती, व्यक्तीचे श्रेष्ठत्व, त्याचप्रमाणे ग्रंथप्रामाण्य त्याला विरोध, सत्य हेच परम मानवी सद्गुणांची जोपासना अशाप्रकारे वैचारिक आणि प्राथमिक भूमिका घेऊन सत्यशोधक समाजाने आपले तत्त्वज्ञान मांडले. ईश्वराची भक्ती ही निरपेक्ष भावनेने असावी, त्यामध्ये मध्यस्थाची अथवा भट भिक्षूची आवश्यकता नाही, याचं प्रतिपादन सत्यशोधक समाजाने केलं. त्याचप्रमाणे व्यक्ती ही जन्माने श्रेष्ठ नसून ती गुणकर्माने श्रेष्ठ ठरते, याचं स्पष्टीकरणही सत्यशोधक समाजाने दिलं. पाप–पुण्य स्वर्ग–नरक पुनर्जन्म या गोष्टीला त्यांनी थारा दिला नाही, तर सत्य हेच परब्रम्ह आहे, अशा प्रकारचा विचार सत्यशोधक समाजाने मांडला. मानवाच्या अंगी असलेल्या सद्गुणांची जोपासना व्हावी, हा विचार दृढ करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला.

सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये महात्मा फ्फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रस्तूत केले आहे. मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित उपेक्षीत समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला.

### फुल्यांची धर्मकल्पना

सार्वजनिक सत्यधर्मफ हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रस्तूत केले आहे. मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित उपेक्षीत समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला.

राष्ट्रपिता जोतीराव फ्फुल्यांची धर्मकल्पना ही त्यांचे स्वतंत्र आकलन आहे. त्या काळातील त्यांच्या सर्व समकालीनांपेक्षा ती वेगळी आहे. समाज जीवनात स्वतंत्रपणे जगण्यास कारणीभूत ठरेल अशी विज्ञानवादी व विवेकनिष्ठ धर्ममांडणी त्यांनी केलेली असल्याचे त्यांच्या चरित्र अभ्यासातून दिसून येते. .

मानवाचा धर्म सत्य आणि निती
बाकी कुनिती जोती म्हणे

त्यांनी केलेली ही धर्ममांडणी त्या काळच्या विषमतावादी धर्माची विवच्छेदक चिकित्सा होती. आणि त्या चिकित्सेतूनच त्यांनी सत्यधर्माची समताधिष्ठित संकल्पना मांडली. त्यात समाजाच्या शोषणाची केंद्र असलेल्या भटशाहीचे समूळ उच्चाटन , शूद्रातिशूद्रांच्या मनात आत्मविश्वास व स्वहक्कांचा समावेश होता. विज्ञानवादाच्या कसोटीवर खोटे ठरलेले धर्मातील कालबाह्य पौराणिक संदर्भ व मनोनांच्छीत भाकडकथा फुल्यांनी अतार्किक ठराविल्या. कार्ल मार्क्सच्यामते , धर्मचिकित्सा ही सर्व चिकित्सांची सुरूवात आहे. एकदा का धर्माची समीक्षा झाली की मग त्यानुषंगाने व्यक्ती स्वातंत्र्यांशी निगडीत असलेल्या सामाजिक ,आर्थिक व राजकीय अशा वेगवेगळ्या समीक्षा करता येते .फयुरोपात मार्क्सचे आधी फ्यूरबाख याने धर्मचिकित्सेचे कार्य पूर्ण केले असल्याने मार्क्सचे काम सोपे झाले होते. त्याने चैत्यन्यवादी परंतु प्रभावशाली तत्त्ववेत्ता असलेल्या हेगेलच्या विचारांच्या समीक्षेने सुरूवात केली . त्यानंतर त्याने हेगेलच्या प्रभावळीतील जर्मन चैतन्यवादी तत्त्ववेत्त्यांच्या विचारांची समीक्षा करून तो त्यानंतर राजकीय अर्थशास्त्राच्या (Political Economics) समीक्षेकडे वळला.

आपल्या भारतात मात्र , फुल्यांना स्वतःच धर्मसमीक्षेसह इतरही समीक्षा एकट्याळाच कराव्या लागल्या आहे .

**जयकुमार चर्जन,** परतवाडा


# तालुक्यातील अनाथ मुलांना बोंडगावदेवी येथे अन्नधान्य व जिवनापयोगी वस्तुचे वाटप

**अर्जुनी मोर.–** तालुक्यातील सामाजीक कार्यकर्ते तथा वरिष्ठ पत्रकार अमरचंद ठवरे यांच्या सामाजीक कार्यातुन पहांदी पारो कुपार लिंगो बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने अर्जुनी मोर. तालुक्यातील अनाथ मुलांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तुचे वाटप मिलींद बुध्द विहार बोंडगावदेवीच्या प्रांगणात अर्जुनी मोर.तहसिलदार अनिरुद्ध कांबळे यांचे हस्ते करण्यात आले. या समाजशिल उपक्रमाला सामाजीक कार्यकर्त्या प्रा.डॉ. सविता बेदरकर , अनिल मेश्राम,भगवान नंदागवळी,धनेंद्र भुरले, सुनिता भेलावे,अमरचंद ठवरे, सुनिल सांगोळकर, व इतर मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी अर्जुनी मोर तालुक्यातील ३० अनाथ मुलांना वेळोवेळी सर्वोतोपरी मदतीचा हात मिळावा म्हणून अमरचंद ठवरे हे सातत्याने प्रयत्न करीत असतात.त्यासाठी जिल्ह्यातील दानदाते सुध्दा मोठ्या प्रमाणात मदत करीत असतात.यामधे बोंडगावदेवी, निमगाव, बाकटी, वडेगाव रेल्वे, ताडगाव, खामखुरा, मांडोखाल, येथील अनाथ व निराधार बालकांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तुचे वाटप करण्यात आले.

यावेळी अर्जुनी मोरगाव चे तहसीलदार अनिरुद्ध कांबळे म्हणाले की जीवन जगत असताना स्वतःच्या परिस्थितीची लाज वाटता कामा नये. आपल्याकडे आहे त्यातच समाधानी राहून इतरानाही मदत करावे असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता गावातील नागरिकांनी सहकार्य केले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# सत्यशोधक चळवळीतील कर्मवीरांचे योगदान



"सर्वसाक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी' हे ब्रीद स्वीकारून क्रांतिसूर्य महात्मा फुले यांनी धार्मिक आणि सामाजिक सुधारणा हा उदात्त हेतू निश्चित करून २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. भारताला आधुनिक, विवेकी, चिकित्सक, संशोधनकेंद्रीत राष्ट्र बनविणे हा उदात्त हेतू त्या पाठीमागे होता. अंधश्रद्धा दूर करून विवेकी समाज निर्माण करून भारत बलशाली होईल ही त्यामागे दूरदृष्टी होती. अन्नदान यापेक्षा ज्ञानाला सर्वोच्च प्राधान्य सामाजिक न्याय, मानवता हाच धर्म, सामाजिक हक्क, विशेष हक्क, राजकीय हक्क, महिला शिक्षण, वंचित उपेक्षित घटकांचे शिक्षण, कर्तव्य, अंधश्रद्धा निर्मूलन याविषयी जागरूकता जाति व्यवस्थेचे समूळ उच्चाटन एकेश्वरवाद, मनुष्य धर्म, माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार, सर्वांना इंग्रजीसह सक्तीचे शिक्षण, शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवणे, सक्तीने वसूल केला जाणारा शेतसारा थांबविणे, सर्व अनिष्ट रूढी, परंपरा, विचारांना विरोध करून सामाजिक व आर्थिक समता निर्माण करणे हा उदात्त हेतू सत्यशोधक समाज संघटनेच्या मागे होता.

महात्मा फुले यांच्यानंतर (१८९०) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लोकराजा राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, परमपूज्य साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाचा वारसा पुढे चालविला. १९०२ मध्ये राजाराम हायस्कूल कोल्हापूर येथे शिक्षण घेत असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव पडला महात्मा फुले यांच्या खंडातून कर्मवीर यांच्या विचारांना चालना मिळाली. एक नवी दिशा मिळाली. विज्ञाननिष्ठा, विवेक यांची शिदोरी घेऊन कर्मवीरांनी आपला प्रवास सुरू केला. यातूनच पुढे १९०९ मध्ये ग्रामस्थांच्या मदतीने सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे सर्व जाति–धर्मांच्या मुलांसाठी मिश्र वसतिगृहाची स्थापना केली. हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला जातिविरहित समाज रचनेवर श्रद्धा ठेवणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे कृतिशील सुधारक होते.

लहानपणी विटा या सांगली येथे आपल्या सवंगड्यांसह खेळत असताना तहान लागली म्हणून शेजारी असलेल्या आडावर गेले पण स्थानिक काही लोकांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मित्रांना पाणी पिण्यास मनाई केली. बंडखोर, स्पष्ट, निर्भीड, सत्याची चाड असलेले बाल कर्मवीर भाऊराव पाटील यांना तो अन्याय सहन झाला नाही. माणसामाणसातील भेदभाव त्यांना अमान्य होता. भाऊराव यांनी आडावरचा रहाट मोडून आडात टाकला व म्हणाले, "आता प्या पाणी; बघतोच कसे पाणी पितात ते" यावरून भाऊरावांची अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची बंडखोर वृत्ती व मानवता हाच धर्म लहानपणापासून त्यांच्या रक्तात भिनलेला दिसून येतो.

सत्यशोधक समाज या संघटनेचे कार्य करीत असताना काही समाजकंटकांनी महात्मा फ्फुले व सावित्रीबाई फुले यांच्यासाठी मारेकरी पाठविले होते तसाच प्रकार भाऊरावांच्या बाबतीत घडला खोट्या प्रकरणात यांना अडकवण्याचा प्रकार म्हणजे डांबर प्रकरण १९१४ मध्ये ब्रिटिश किंग एडवर्ड ७ वे यांच्या कोल्हापूर मधील पुतळ्याला मुद्दाम कोणीतरी डांबर फासले आणि तो प्रकार सत्यशोधक समाज संघटनेचे कार्यकर्ते व माजी अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांच्या सांगण्यावरून झाला अशी खोटी साक्ष द्यावी यासाठी भाऊरावांवर दबाव टाकण्यात आला. अण्णासाहेब लठ्ठे सत्यशोधक समाजाचे खंदे समर्थक, पुरस्कर्ते आणि वंदनीय व्यक्तिमत्व होते. भाऊरावांचे ते गुरू होते. भाऊरावांनी खोटी साक्ष देणार नाही असे स्पष्ट सांगितले. आणि त्यासाठी अन्य कोणत्याही परिणामांना सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. या प्रकरणात अनेक दिवस भाऊरावांना कारावास सहन करावा लागला. भाऊराव कणखर, निर्भय होते. अखेरपर्यंत ते सत्याच्या बाजूने उभे राहिले. शेवटी मातोश्री गंगाबाई यांनी राजर्षी शाहू महाराज यांची रस्त्यावर बग्गी अडवून सत्यता जाणून शिक्षा व्हावी असा आग्रह धरला व पुढे भाऊराव यांची डांबर प्रकरणातून सुटका झाली.

२५ सप्टेंबर १९१९ सत्यशोधक समाज संघटनेची परिषद सातारा जिल्ह्यातील काले गावी होती. केशवराव बागडे यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद पार पडली. बहुजनांचा उद्धार हाच प्रमुख उद्देश या परिषदेचा होता. यासाठी तात्विक बैठक कार्यक्रम, भविष्यातील नियोजन, अडथळे व कामाचे वाटप यासाठी ही परिषद होती या परिषदेला व केशवराव जेधे, भाई माधवराव बागल, प्रबोधनकार ठाकरे यांनी बहुजनांच्या उध्दारासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण संस्था सुरू करावी आणि सर्व जाति–धर्मांच्या मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्यवस्था निर्माण करावी अशा प्रकारची विनंती केली. कर्मवीरांनी ती विनंती मान्य केली. शब्द पाळला आणि ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना सातारा जिल्ह्यातील काले या गावी केली.

राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्या कार्यामुळेच १९१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला भारतातील जनतेच्या शिक्षणाचा अधिकार मान्य करावा लागला. याचाच भाग म्हणून लोकमान्य टिळक, राजर्षी शाहू यांनी शिक्षण संस्था उभारणीमध्ये भाग घेतला. भाऊरावांनी १९२१ मध्ये वाळवे तालुक्यातील नेर्ले या गावी वसतिगृहाची स्थापना केली. सर्व जाति–धर्मांच्या मुलांना शिक्षणासाठी निवासासाठी गावोगावी वसतिगृह सुरू करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले.

२६ जानेवारी १९५० मध्ये भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली भारतीय संविधानातील कलम २१ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकांना सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार आहे ही शिकवण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फ्फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी यांच्याकडून कर्मवीरांना हे संस्कार मिळाले होते.

१९२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेचे स्थलांतर सातारा येथे धनिणीच्या बागेत वसतिगृहाची सुरुवात झाली. ग्रामीण भागातल्या कष्टकरी, होतकरू विद्यार्थ्यांना खांद्यावर आणले. आणि शिक्षणाची सोय निर्माण केली. वेळ प्रसंगी पत्नीचा सौभाग्यलंकार गहाण टाकून वसतिगृह सुरू ठेवले व शेकडो विद्यार्थी राष्ट्राच्या सेवेसाठी तयार केले. यामध्ये क्रांतिवीर, बॅरिस्टर, माजी कुलगुरू पी.जी.पाटील, ज्येष्ठ स्वातंत्रसैनिक आप्पासाहेब पाटील, इस्माईलसाहेब मुल्ला, शंकरराव खरात, ज्ञानदेव धृवनाथ घोलप, लक्ष्मण भिंगारदिवे, रामभाऊ नलावडे, माजी कुलगुरू, प्राचार्य शिवाजीराव भोसले, क्रांतिवीर प्रा.ग.प्र.प्रधान हे सुद्धा वसतिगृहात येत मित्रांबरोबर अभ्यास करीत, खेळत असे अनेक महनीय व्यक्तिमत्त्व या वसतिगृहातून राष्ट्राच्या सेवेसाठी बाहेर पडले व राष्ट्राच्या, समाजाच्या उद्धारासाठी अखेरपर्यंत झिजले. जांत न पूछो सज्जन की, पूछ लीजिए ज्ञान, मोल करो तलवार का, पडा रहने दो म्यान कर्मवीरांनी संत कबीरांचे हा दोहा आजीवन जपला. स्तर, भाषा, प्रदेश, धर्म याचा विचार न करता सामान्य, होतकरू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे आणि राष्ट्राच्या सेवेसाठी जावे हा विचार त्यांनी आजीवन जपला आणि ग्रामीण भागात वसतिगृहाची व शाळा, महाविद्यालयांची सुरुवात केली.

२५ फ्फेब्रुवारी १९२७ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या शुभहस्ते श्री.छत्रपती शाहू बोर्डिंग हाउस क्रमांक –१ धनिणीची बाग, सातारा या वसतिगृहाचे नामकरण झाले. यावेळी लक्ष्मणराव बाबाजी भिंगारदिवे या विद्यार्थ्याने संस्कृत मध्ये उत्तम भाषण केले. भाषण ऐकून महात्मा गांधी यांनी स्वतःच्या गळ्यातील हार काढला आणि लक्ष्मणराव भिंगारदिवे यांच्या गळ्यात घातला.

त्यावेळी वसतिगृहात १० मराठे, ३ महार, ३ मांग, ३ चांभार, ३ मुसलमान, २ साळी, १ धनगर, १ सोनार, १ होलार, १ कोष्टी अशी सर्व जाति–धर्माची मुले एकत्र अभ्यास करतात जेवण करतात ते पाहून महात्मा गांधी म्हणाले, "मी जे साबरमती आश्रमात करू शकलो नाही ते भाऊरावांनी या वसतिगृहात करून दाखवले आहे' "उनका कार्य ही उनका सच्चा कीर्तिस्तंभ हैं असे म्हणून पुढे हरिजन फंडामधून रुपये ५०१ रुपयाची दरवर्षी मदत सुरू केली. भाऊराव पाटील यांनी कष्टाळू, अभ्यासू, होतकरू विद्यार्थी यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठविले. यामध्ये मेघा कांबळे, टी.बी.आवळे, बाबासाहेब बोबडे हे अस्पृश्य समाजातील होते. अण्णांनी कधीही धर्म व जात पाहिली नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी मदत मिळविण्यासाठी गावोगावी फिरत होते. आदरणीय आर.व्ही.खैरमोडे हे अतिशय गुणी, विचारी व अभ्यासू माजी विद्यार्थी त्यांना आष्टा येथील महात्मा गांधी विद्यालयाचे पहिले मुख्याध्यापक म्हणून संधी दिली. अस्पृश्य समाजातील असल्याने त्यालाही समाजातून विरोध झाला पण भाऊरावांनी विरोधाची तमा न बाळगता मुख्याध्यापकपदी संधी दिली. पुढे याच आर.व्ही.खैरमोडे गुरुजी यांनी महाराष्ट्राचा बुलंद आवाज, माजी मंत्री, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन स्व.प्रा.एन.डी.पाटील यांच्यासारखे विवेकी विद्यार्थी घडविले व राष्ट्राच्या सेवेसाठी काम करण्यास दिशा व मार्गदर्शन केले. सामाजिक दास्य, आर्थिक दास्य, राजकीय दास्य हे गुलामगिरीचे ३ प्रकार मुळापासून काढून टाकण्याचे संस्कार कर्मवीर भाऊराव पाटील यांचेकडून मिळाले.

१९३२ मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुणे, पांडवनगर येथे "युनियन बोर्डीग हाऊस' म्हणजे मिश्र वसतिगृह सुरु केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यात संत गाडगेबाबा यांचे योगदान मोठे आहे. १९५४ मध्ये कराड, सातारा येथे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण मिळावे यासाठी महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयासाठी पुणे येथील महात्मा फ्फुले मंडई येथील व्यापारी व हमाल यांनी देणगी गोळा केली. यामध्ये पुण्याचे पहिले महापौर बाबुराव सणस, उद्योगपती गणपतराव शेडगे, नामदेवराव मते, रामभाऊ तुपे, जयसिंगराव ससाणे मास्तर, व्यापारी, हमाल यांच्यासारख्या अनेक विवेकवादी, चांगुलपणा जपणाऱ्या माणसांची मोलाची मदत झाली. पुढे ही देणगी कराड येथील महाविद्यालयास देण्यात आली. या महाविद्यालयाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून भाऊरावांनी संत गाडगेबाबा यांना निमंत्रित केले. संत गाडगेबाबा यांनी एक दिवस अगोदर येऊन पहाटे महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वतः झाडून स्वच्छ केला आणि उद्घाटन झाले असे जाहीर केले. आज महाविद्यालय अत्याधुनिक सुविधांनी सज्ज आहे. या महाविद्यालयाचे नाव सद्गुरू गाडगे महाराज (SGM) महाविद्यालय आहे.

प्रत्येक शाळेत प्रशिक्षित व गुणवत्तापूर्ण, तंत्रस्नेही शिक्षक असावेत अशी भाऊरावांची अपेक्षा होती. शिक्षक व शिक्षणाचा निरंतर गुणवत्तापूर्ण विकास करण्यासाठी १७ जुलै १९३५ रोजी 'सिल्व्हर ज्यूबिली रुरल ट्रेनिंग कॉलेज' (महात्मा फुले अध्यापक विद्यालय) खासगी संस्थामार्फ्फत सुरु केलेले हे महाराष्ट्रातील पहिले ट्रेनिंग कॉलेज आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्या–पाड्यात प्रशिक्षित व दर्जेदार शिक्षक मिळावे. हे कर्मवीरांचे स्वप्न होते. यासाठी जाणीवपूर्वक हे अध्यापक विद्यालय कर्मवीरांनी सुरु केले. कृष्णाजी शंकर दिक्षित हे पहिले प्राचार्य कर्मवीरांनी त्यांचीही जात पहिली नाही. उत्तम प्रशासकीय क्षमता, झोकून देऊन काम करण्याची तयारी, विवेक यालाच प्राधन्य दिले. आजही या अध्यापक विद्यालयात भविष्याचे वेध घेणारे, भविष्यातील भारतासाठी सक्षम, जागतिक स्पर्धेत उच्च दर्जाची कामगिरी करणारे, आव्हाने पेलणारे, स्वच्छतेपासून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणारे, उत्तम जीवन जगता येणारे विद्यार्थी कसे निर्माण करावेत तसेच उच्च दर्जाच्या प्रशासकीय क्षमता विकसित करण्यासाठी सेवेत असणारे शिक्षक व प्रशिक्षणार्थी यांना सातत्याने ट्रेनिंग, मार्गदर्शन करून राष्ट्राच्या बौद्धिक व सामाजिक विकासात योगदान देत आहे.

So>ciety can not progress unless women are educated. हा सावित्रीबाईचा विचार भाऊरावांनी आजीवन जपला. भारतीय बौद्ध महासभा शाखा, पुणे चे अध्यक्ष एम.के.मोरे यांना १४ एप्रिल १९५९ ला भाऊराव पाटील यांनी लिहिलेल्या पत्रात मुलींच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई आंबेडकर यांच्या नावाने संस्थेने मुलींसाठी विद्यालय सुरू करण्याचे ठरविले. पुढे १९६० मध्ये भीमाबाई आंबेडकर कन्या विद्यालय, कर्मवीर समाधी परिसर, सातारा येथे संस्थेने सुरु करून कर्मवीरांची इच्छा पूर्णत्वास नेली. स्वतःचे चिरंजीव आप्पासाहेब भाऊराव पाटील व सुशिलाबाई आप्पासाहेब पाटील यांच्या विवाहाच्यावेळी (१० मार्च १९४३) सर्व दागिने, भेट वस्तू १९४२ मध्ये मुलींसाठी सुरु केलेल्या जिजामाता अध्यापिका विद्यालय सुरू केले. लग्नात कोल्हापूरच्या महाराणी ताराबाईसाहेब या स्वतः उपस्थित राहून दिलेले राणीछाप चांदीचे ५०० रुपयांनी भरलेले ताट भेट दिले व इतर आहेराचे १००० रुपये अशी सर्व रक्कम जिजामाता अध्यापिका विद्यालयाच्या सुविधांसाठी सुपूर्द केले.

आज भारताची लोकसंख्या १४० कोटीच्यापुढे आहे. जगातील एकूण लोकसंख्येच्या १७ ते १८ टक्के लोकसंख्या ही भारतातील दिसून येते. अशावेळी नापीक जमिनीवर घरे बांधावीत, शेत जमिनीवर घरे आणि इमारती बांधू नयेत अशा सूचना तत्कालीन सरकारला केल्या. रयत शिक्षण संस्थेला जमीन देणगी देत असताना कर्मवीरांनी नेहमी पडीक जमिनी स्वीकारल्या. यासाठी "Give me waste land, we will turn into best land." याचा आग्रह धरला. देवापुर तालुका माण, सातारा येथे माळरानावर ग्रामस्थांच्या मदतीने शंभर एकर जमीन दीर्घ मुदतीच्या कराराने घेतली. जमीन पिकाऊ होण्यासाठी राजेवाडी तलावातील गाळ वाहून नेण्याची परवानगी २१ ऑगस्ट १९५६ मे. सब.डिव्हिजनल ऑफिसर, पंढरपूर इरिगेशन यांना लिहिलेल्या पत्रात एकराला १०० गाड्या अशा १ लाख गाड्या गाळ उपसण्यासाठी परवानगी घेतल्याची दिसून येते. शाश्वत विकासाबरोबर विज्ञानाशिवाय शेती नाही या शास्त्रीय दृष्टीकोनाबरोबर आधुनिक नाविन्यपूर्ण बदल, पाण्याचे व पिकांचे व्यवस्थापन, मानवाच्या गरजा लक्षात घेऊन शेती केली तर शेतकरी टिकेल, सुखी होईल याबाबत भाऊरावांनी नेहमी मार्गदर्शन केले. भाऊराव यांचे कार्य सामाजिक सुधारणा त्याचबरोबर आर्थिक स्तर उंचाविणे, शाश्वत विकास हा त्यामागचा उदेश्य होता.

भाऊराव पाटील यांनी आणि गावांमध्ये शाळा सुरु करत असताना जाणीवपूर्वक स्मशानभूमी जवळची जागा निवडत असत. पडीक जमिनीचा विकास करण्यासाठी पसंती दिली. पडीक जमिनी स्वीकारल्या अंधश्रद्धा निर्मूलन, विवेक, वैज्ञानिक दृष्टी, श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये खऱ्या अर्थाने कर्मवीरांनी दिली. नवीन शाळा सुरू करत असताना कधीही मुहूर्त बघितला नाही, तिथी बघितल्या नाही, राशी पाहिल्या नाही ते सच्चे कृतिशील आणि पुरोगामी सुधारक, शिक्षणतज्ज्ञ व शेतीतज्ज्ञ होते.

या सामाजिक व शैक्षणिक कार्यात कर्मवीरांच्या सहचारिणी सौ.लक्ष्मीवहिनी यांचे योगदान आभाळाएवढे मोठे आहे. कर्मवीर घरी नसताना सर्व जाति–धर्माच्या मुलांची सेवा केली. नेटकेपणाने जबाबदारी पार पाडली. पतीच्या कार्यात तन–मन–धनाने साथ दिली. शेकडो तोळे सोने या मुलांच्या शिक्षणासाठी आणि वसतिगृहासाठी मोडून टाकले. शेवटी सौभाग्यालंकार सुद्धा गहाण ठेवावे लागले.

सौभाग्यालंकार वसतिगृहाचा सचिव आप्पालाल शेख याच्या हातात ठेवताना आप्पालाल ते मंगळसूत्र घेण्यास तयार नव्हते त्यावेळी त्या म्हणाल्या. माझा पती एवढा कर्तबगार असताना मला या मंगळसूत्राची गरजच काय? भारतमाता सौ.लक्ष्मीवहिनी या खऱ्या अर्थाने सत्यशोधक होत्या. २७ नोव्हेंबर १९४८ च्या एका कार्यक्रमात कर्मवीर भाऊराव पाटील म्हणाले सर्वांच्या ऋणातून मुक्त झालो पण माझ्या पत्नीचा ऋणातून मला मुक्त होता आले नाही.

दिनदुबळ्या, वंचित, उपेक्षित घटकांची सेवा, शिक्षणाचे कार्य त्यांनी आजन्म केले. आज रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्र व कर्नाटकसह १६ जिल्ह्यात ७४७ शाखा कार्यरत आहे. सुरुवातीला ४ विद्यार्थी आज ४,२७,४८० विद्यार्थी वटवृक्षाच्या सावलीत ज्ञानसाधना करीत आहे. कर्मवीरांची हीच दूरदृष्टी होती. कमवीरांप्रमाणे सत्यशोधक समाजाची दिंडी पुढे घेऊन जाणाऱ्या रयत शिक्षण संस्थेसह सर्व कार्यकर्ते यांना मन:पूर्वक शुभेच्छा व हृदयपूर्वक नमन !

**प्रा.प्रदीप बबन हिवरकर**
रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले अध्यापक विद्यालय, सातारा
hivarkar11pradeep@gmail.co

# नेत्यांच्या भाषेचा स्तर घसरतोय का?

भारत हा लोकशाही प्रधान देश असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. संविधानाने सुद्धा आम्हाला संवैधानिक मार्गाने आपला विरोध व्यक्त करण्याचा, टीका करण्याचा अधिकार बहाल केलेला आहे. राजकारणात तर दररोज विविध राजकीय पक्षांचे पुढारी एकमेकांवर राजकीय टिका टिपणी करत असतात. त्यात वावगे असे काहीही नाही. पूर्वीपासूनच ही परंपरा चालत आलेली आहे. परंतु त्या काळातील राजकीय नेत्यांची टीका आणि सध्याच्या काळातील नेत्यांची टीका यामध्ये जमीन आसमानचे अंतर आहे. आताच्या राजकीय नेत्यांनी सर्व मर्यादा पार केलेल्या आहेत. त्यांच्या भाषेचा स्तर अत्यंत खालावलेला असून लोक आपल्याला काय म्हणतील याची जराही शरम राजकीय पुढाऱ्यांना राहिलेली नाही. पूर्वीचे नेते प्रचंड अभ्यासू होते. सर्व क्षेत्राचा त्यांचा जबरदस्त अभ्यास होता. सभागृहात बोलताना ते अनेक संदर्भ देऊन बोलायचे. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय विषयांवरचे संदर्भ, उदाहरणे, तारखा, ग्रंथांची नावे, दाखले त्यांच्या भाषणामध्ये असायचे. त्यामुळे त्या काळातील नेत्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावशाली होते आणि जनतेवर त्यांचे वजनही पडत होते.

त्यांच्या तुलनेत आजचे राजकीय नेते कुठेच नाही.संसद असो की विधिमंडळ असो; प्रत्येक राजकीय पक्षामध्ये फक्त बोटावर मोजण्याइतकेच असे नेते आहे की ज्यांना खरोखर राजकीय ज्ञान आणि अभ्यास आहे. मोजकेच राजकीय नेते सर्व विषयांवर बोलण्यात वाकबगार आहे आणि ज्यांचा सभागृहामध्ये प्रभाव पडतो.बाकी नेते मात्र फ्फक्त वाह्यात, वायफळ आणि बेताल वक्तव्य करण्यातच पटाईत आहे आणि त्यामधूनच प्रसिद्धी मिळवण्याचा त्यांचा सतत हव्यास असतो.

कोणत्याही क्षेत्राचा या नेत्यांचा फारसा अभ्यास नसतो. राजकारणात असूनही सर्वंकष राजकीय ज्ञानसुद्धा त्यांना नसते. आपल्या मतदारसंघापुरतेच माहिती ते ठेवत असतात. बाकी राज्य, देश, विदेश यामध्ये काय सुरू आहे याच्याशी त्यांना काहीच घेणेदेणे नसते. सर्व पक्षाच्या राजकीय नेत्यांनी अभ्यास आणि वाचन करून सभागृहात आपले मत मांडले पाहिजे यासाठी राज्य आणि देशाच्या सभागृहात मोठमोठी ग्रंथालये निर्माण केली आहेत. त्यामध्ये राजकीय विषयांवर सर्व बाजूंनी माहिती असणारे देश विदेशातील प्रसिद्ध लेखकांचे हजारो पुस्तके आहेत. आमदार, खासदारांनी ग्रंथालयात जाऊन वाचन, अभ्यास करावा व राजकीय ज्ञान प्राप्त करूनच बोलावे अशी घटनाकारांची अपेक्षा होती. परंतु या ग्रंथालयात किती आमदार, खासदार जातात याचा जर शोध घेतला तर आपल्याला फार मोठा धक्का बसेल. फक्त प्रसिद्धी मिळवण्यासाठी आणि आपल्या नेत्याच्या नजरेत भरण्यासाठी ते एकमेकांना अतिशय अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करतात. मारण्याच्या धमक्या देतात, जीभ कापण्याच्या वल्गना करतात, जिभेला चटके देण्याची भाषा करतात, सभागृहात एकमेकांच्या अंगावर धावून जातात मारामाऱ्या करतात. हे खरोखर लोकप्रतिनिधींना शोभा देते काय असा प्रश्न सुद्धा विचारणे आता मूर्खपणा आहे.

त्यामुळे हे कायदे बनवणारे देशातील जनतेचे प्रतिनिधी आहे की गाव गल्लीतील गुंड आहे असा प्रश्न लोकांच्या समोर निर्माण झाला आहे. कित्येक राजकीय नेत्यांचा पेहराव पाहून तर ते नेते म्हणजे कुख्यात गुंड, मवाली वाटतात. हातातल्या बहुतांश बोटांमध्ये हिऱ्या–मोत्यांच्या मोठमोठ्या अंगठ्या, दोन्ही हातामध्ये सोन्या–चांदीचे कडे, धार्मिक बाबांनी दिलेले धागेदोरे, गंडे, गळ्यात सोन्याच्या साखळ्या, असा विचित्र पेहराव पाहून असे वाटते की हे लोकप्रतिनिधी आहेत की हिंदी चित्रपटातील विलन आहेत. या अशा टुकार राजकीय पुढाऱ्यांनी, फ्फार कष्टांनी उभी झालेली आमची लोकशाही उध्वस्त करण्याचा विडाच उचललेला आहे असे वाटते. त्यांना घटनेचे कायदे, नियम नको असून त्यांना फक्त त्यांची दादागिरी आणि जनतेवर धाक, दरारा पाहिजे आहे. अशा लोकांमुळे अभ्यासू आणि सुज्ञ लोकप्रतिनिधी मागे पडत असून सभागृहात आता हुशार प्रतिनिधींची संख्या बोटावर मोजण्या इतकीच शिल्लक राहिलेली आहे. शिवीगाळ करणाऱ्या लोकप्रतिनिधींना जास्त प्रसिद्धी मिळत असल्यामुळे लोक सुद्धा अशाच प्रतिनिधींकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे भाषेची मर्यादा ओलांडून घाणेरड्या आणि हिंसक भाषेत बोलणाऱ्या प्रतिनिधींना निवडून द्यायचे की अभ्यासू प्रतिनिधी सभागृहात पाठवायचे हे आता जनतेनेच ठरवायचे आहे.

**प्रेमकुमार बोके,** अंजनगाव सुर्जी

# कोहळी समाज विकास मंडळाची कार्यकारिणी गठीत

**गोंदिया:** कोहळी समाज विकास मंडळ केंद्रीय कार्यकारणी नागपूरतर्फे कोहळी समाजाचे अध्यक्ष प्रकाश बाळबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली साकोली येथे कोहळी समाज गोंदिया जिल्ह्यातील विकास मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.





समाजाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार हेमकृष्ण कापगते यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंडळाचे उपाध्यक्ष अमोल पाटील मुंगमोडे, डॉ. गजानन डोंगरवार, चामेश्वर गहाणे, मंडळाचे सचिव माणिक लोथे, सहसचिव डॉ. राजेश कापगते, यांच्या उपस्थितीत गोंदिया जिल्हाध्यक्षपदी किशोर डोंगरवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सचिवपदी पं.स. उपसभापती होमराज पुस्तोडे यांची निवड करण्यात आली.

कार्यकारणीच्या उपाध्यक्षपदी राधेश्याम कापगते, हेमकृष्ण संग्रामे, सहसचिव सुरेश परशुरामकर, कोषाध्यक्ष चोपराम गोबाडे, संघटकपदी विलास कापगते, दिलीप लोदी, अरविंद कापगते, प्रकाश काशीवार, डॉ. रामलाल गहाणे, जयंत लांजेवार, ललित डोंगरवार, रमेश गहाणे, मनोज नाकाडे, लक्ष्मीकांत नाकाडे, रमेश संग्रामे, महिला प्रतिनिधी डॉ. छाया लंजे, निशा काशीवार, कायम निमंत्रित सदस्य गंगाधर परशुरामकर, डॉ. गजानन डोंगरवार, चामेश्वर गहाणे, रचनागहाणे, जयश्री देशमुख, कविता कापगते, चंद्रकला डोंगरवार व मार्गदर्शक म्हणून प्रमोद लांजेवार, यशवंत परशुरामकर, जीवन लंजे, लोकपाल गहाणे, डॉ. अविनाश काशीवार, डॉ. निलकंठ लंजे, अशोक खुणे, प्रभाकर गहाणे यांची निवड करण्यात आली.

# भारतीय संविधान बदलून मनुस्मृती लादू पाहणाऱ्या सरकारला धडा शिकवा-प्रा.श्याम मानव

## कर्जाचे डोंगर लादून भांडवलदारांना मोठे केले जात आहे, महागाई आणि बेरोजगारीमध्ये प्रचंड वाढ




**देवरी–** देशात मोदीचे सरकार आल्यापासून मनुवादी विचारांच्या लोकांना भारतीय संविधानाविरोधात बरडण्याची संधी मिळाली. भारतीय संविधान हे देशाच्या संस्कृतीनुसार नसून ते युरोपीय संस्कृतीचे आहे, असे विष लोकांमध्ये पसरवून भारतीय संविधान हटवून मनुस्मृती लागू करण्याच्या हालचालींमध्ये वाढ झालेली आहे. भारतीय संविधान सभेत अनेक विद्याविभूषित मान्यवर असताना आपले संविधान एकमताने संमत झाले, हे जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय संविधानामुळे माणसाला माणसाचे अस्तित्व टिकवून ठेवणे शक्य आहे. लोकसभेच्या निवडणूकीत सत्ताधारी पक्षाला फटका बसल्याने त्यांच्या मनसुब्यांना ब्रेक लागला. परिणामी, लेटरल नोकर भरतीसारख्या चलाख्या करून बहुजन समाजाला प्रशासनातून हद्दपार करण्याची प्रक्रिया मोदींना थांबवावी लागली. आता राज्यात विधानसभेच्या निवडणुका आहेत. यामुळे समाजात विषमता निर्माण करून महागाई, रोजगारी वाढवून राज्याला कर्जाच्या खाईत लोटणाऱ्या असंवैधानिक सरकारला हद्दपार करण्याची जबाबदारी आता आपल्यावर आली आहे, असे प्रतिपादन राजकिय विश्लेषक तथा अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव येथे शनिवारी (दि.२१) देवरी येथे बोलताना केले.

ते देवरी येथील सीताराम मंगल कार्यालयात अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या देवरी शाखेच्या वतीने आयोजित संविधान बचाओ–महाराष्ट्र बचाओ कार्यक्रमांतर्गत भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आमगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार सहसराम कोरोटे हे होते. यावेळी मंचावर अनिसचे जिल्हासंघटक प्रा. प्रकाश धोटे, प्रसिद्ध विचारवंत दशरथ मडावी, सुरेश झुरमुरे, डी.जी रंगारी, विजय बहेकार आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. मानव म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पक्षात भटधार्जिण्या नेत्यांना बहुजनांची प्रगती मान्य नव्हती. यामध्ये लोकमान्य टिळक अग्रस्थानावर होते. असे असताना मनुस्मृती विचारांच्या लोकांनी त्यांना लोकमान्य करून टाकले. लोकमान्य टिळकामुळे स्वातंत्र्य मिळणे कदापि शक्य नव्हते. महात्मा गांधी यांनी बहुजनांसह समाजाला एकसूत्रात बांधल्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, हे सत्य आहे. म.गांधी हे हिंदू धर्माचे पुरस्कर्ते असले तरी विषमतवाद आणि भेदाभेद त्यांना मान्य नव्हता. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना कायदामंत्री करण्याचा अट्टाहास महात्मा गांधींनी केला. त्यांना संविधान तयार करण्याचे काम सोपविण्यासाठी पंडित नेहरूंना सूचविले. मात्र, बाबासाहेब आणि महात्मा गांधी यांचा बराच इतिहास समाजापासून लपविण्यात आला. देशाच्या सर्वोच्चपदी हिंदू विराजमान असून सुध्दा हिंदू धोक्यात असल्याचा प्रचार केला जातो. आणि हिंदूराष्ट्र तयार करण्याची भाषा बोलली जाते. असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराजांचा दाखला देत प्रा. मानव म्हणाले की, मनुवाद हा देशातील बहुसंख्य लोकांच्या हिताचा नाही. पूर्वी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी वर्ण व्यवस्था होती. आता कलियुगात ब्राम्हण आणि शुद्र हे दोन कायम ठेवून क्षत्रिय आणि वैश्य वर्ण हे निलंबित करण्यात आले आहेत. यावरून हिंदूराष्ट्र संकल्पना आपण समजून घेतली पाहिजे. सध्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी हे अमेरिकेत जाऊन आरक्षण विरोधी भाष्य केल्याचा कांगावा केला जात आहे. मात्र, राहूल गांधी हे इंग्रजीतून काय बोलले, हे भाजपच्या नेत्यांना कळलेच नाही. यावरून त्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान किती आहे, हेही दिसून आल्याचे ते म्हणाले. मूळात राहूल गांधी हे लोकसंख्या आधारित जनगणना आणि टक्केवारीनुसार आरक्षण याप्रती कटिबद्ध असल्याचे स्पष्ट आहे. ते जे बोलतात, ते करून दाखविण्याची धमक आहे. संविधान आणि आरक्षण वाचविण्याची लढाई राहूल गांधी लढत असल्याने मनुवादी त्यांचे विरुद्ध नेहमी कटकारस्थान करीत असल्याचे आता लपून राहिले नाही. याउलट बहुजन समाजाविरुद्ध हीन भावनेने वागणारे बुवाबाबा आणि भिडे यांच्या सारखे बेताल बोलणाऱ्या लोकांचे भाजप समर्थन करते.

लोकसभेच्या निवडणुकीत काहीसा चाप बसल्याने भाजपच्या मनसुब्यांवर पाणी फिरले. त्यामुळे प्रशासकीय सेवेत आपल्या माणसांची लेटरल एन्ट्री करून आरक्षण संपविण्याचे काम मोदी सरकारला थांबवावे लागले आहे. आता महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक आहे. यावेळी महायुतीचे असंवैधानिक सरकार घालविण्याची जबाबदारी मतदारांवर आहे. अन्यथा बेरोजगारी आणि महागाईपासून आपल्याला कोणीही वाचवू शकणार नाही, असा इशारा ही त्यांनी यावेळी बोलताना दिला.यावेळी शेकडोंच्या संख्येने श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कृष्णा ब्राम्हणकर यांनी केले.

# ९१ कृषी केंद्राचे परवाने कायमस्वरूपी रद्द, आठ निलंबित; भरारी पथकांची कारवाई

**गोंदिया:** जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बोगस बी–बियाणे, खते व कीटकनाशकाच्या विक्रीस आळा घालण्यासाठी कृषी विभागाने नऊ भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच २६ गुणनियंत्रण निरीक्षकांचा समावेश असून गुणनियंत्रण निरीक्षकामार्फत कृषी केंद्राची अचानक तपासणी केली असता त्यात अनियमितता आढळल्याने ९१ कृषी केंद्राचे परवाने कायमस्वरूपी रद्द, तर आठ केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले.

कृषी केंद्राच्या तपासणी–वेळी विक्री परवान्यामध्ये उगम प्रमाणपत्राचा समावेश नसणे, नोंदणी प्रमाणपत्र विहित मुदतीत नूतनीकरण न करणे, शिल्लक साठा व दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, साठा व विक्री रजिस्टर न ठेवणे, रजिस्टरवरील साठा व प्रत्यक्ष साठा न जुळणे, विक्री करत असलेल्या कृषी निविष्ठांचे खरेदी बिल न ठेवणे, ग्राहकास देण्यात येणाऱ्या खरेदी पावतीवर ग्राहकाची सही न घेणे, आदी कारणांमुळे आठ कृषी केंद्रांचे परवाने दोन महिन्यांसाठी निलंबित केले. शेतकऱ्यांना त्यांच्यात गावात कृषी निविष्ठा उपलब्ध व्हावे म्हणून शैक्षणिक पात्रता असलेल्या अर्जदारांना परवाना देण्यात आले होते; परंतु कृषी केंद्र संचालक यांनी परवान्यामध्ये नमूद घर क्रमांकावर कृषी केंद्र उघडलेले नसून बियाणे, खते व कीटकनाशकाच्या परवान्यावर कोणतेही खरेदी–विक्री न करणे व कोणतेही दस्तऐवज जतन न केल्याने ९९ कृषी केंद्राचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले.



**हे कृषी केंद्र दोन महिन्यांसाठी निलंबित**

**एस. आर. कृषी केंद्र दांडेगाव, ता. गोंदिया बियाणे, खते व कीटकनाशके परवाना २ महिन्यांकरिता, शेतकन्या महिला शेतकरी उत्पादक कंपनी, दांडेगाव, ता. गोंदिया बियाणे, खते व कीटकनाशके परवाना २ महिन्यांकरिता, मों. गायत्री कृषी केंद्र मेंढा, ता. तिरोडा बियाणे, खते व कीटकनाशके परवाना २ महिन्यांकरिता असे एकूण ८ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.**

## पवार नवयुवक समितीचे गठन

**गोंदिया :** पवार प्रगतिशील मंचच्या वतीने पवार नवयुवक समितीचे गठन करण्यात आले. समितीच्या अध्यक्षपदी प्रविण पटले तर सचिव म्हणून राहुल बघेले यांची निवड करण्यात आली.

पवार नवयुवक समितीचे गठन करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत पवार प्रगतीशिल मंचच्या वतीने समितीचे गठन करून नविन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रविन पटले, उपाध्यक्ष अश्विन ठाकरे, विशाल रहांगडाले, सचिव राहुल बघेले, सहसचिव हिमांशु पटले, श्रीकांत बोपचे, कोषाध्यक्ष अंकुश पटले, संगठन सचिव विवेक एस. बिसेन, प्रचार सचिव आशीष चौधरी, लिकेश रहांगडाले, शुभम बिसेन, मयूर अंबुले, सांस्कृतिक प्रमुख अश्विन ठाकुर, अभिनव टेंभरे, क्रीड़ा प्रमुख शुभम रहांगडाले, अनिकेत बिसेन, निर्मल सोनवाने, शुभम गौतम यांची निवड करण्यात आली. तर सदस्यांमध्ये मंगेश रहांगडाले, यश कटरे, गगन बिसेन, शरद सोनवाने, भाविक बिसेन, पारस बोपचे, सतीश पटले, प्रताप पटले, प्रदीप रहांगडाले, नमन रहांगडाले, अनमोल पटले, देवाशीष बिसेन, कृष्णा बिसेन, विरेन्द्र हरिणखेड़े, अमूल टेंभरे, वैभव बिसेन, सागर टेंभरे यांचा समावेश करण्यात आला आहे. नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांचे पवार प्रगतीशिल मंचचे अध्यक्ष ॲड.पृथ्वीराज चौहान, उपाध्यक्ष पन्नालाल ठाकरे, सचिव डॉ.प्रिती गौतम, संघटन सचिव सुरेश पटले, बंटी बोपचे, अजय रहांगडाले, पंकज पटले, दिलीप पारधी, महेंद्र बिसेन, रश्मी रहांगडाले आदिंनी अभिनंदन केले आहे.

# सत्यशोधक समाजाचा १५१ स्थापना दिन टेमणीत उत्साहात साजरा




**गोंदिया:**–महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजातील जातीभेद विरोधात सर्वप्रथम आवाज उठवला. पण केवळ या प्रथांना विरोध करणे पुरेसे नाही तर त्याविरोधात जनजागृती होणे गरजेचे आहे, त्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. महात्मा ज्योतिबा फुले यांनी धार्मिक मक्तेदारी, एकाधिकारशाही, अनिष्ट प्रथा–परंपरा, चालीरीती, धार्मिक पाखंड, वर्ग आणि वर्णव्यवस्था याविरोधात आवाज उठवला असे विचार सामाजिक कार्यकर्त्या डॉ.प्रा.सविता बेदरकर यांनी व्यक्त केले.त्या (दि.२३) तालुक्यातील टेमणी येथे ओबीसी अधिकार मंच,फुले शाहू बिरसा आंबेडकर विचारमंच व इतर बहुजन संघटनाच्यावतीने आयोजित सत्यशोधक समाज १५१ व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होत्या.

यासर्वत्रासातून समाजाला मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. सत्यशोधक समाजाची स्थापना म्हणजे धार्मिक सुधारणांचा पाया आणि मानव मुक्तीचे पहिले पाऊल होते असे मत प्रा.सविता बेदरकर यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी ओबीसी अधिकार मंचचे मुख्य संयोजक खेमेंद्र कटरे,ओबीसी चळवळीतील जेष्ठ पदाधिकारी रमेश ब्राम्हणकर,कैलास भेलावे,शालीकराम भेलावे,माळी समाज अध्यक्ष संदिप बानेवार,फुले–शाहू–बिरसा–आंबेडकर संघटनेचे नरेश परिहार,इर्रीचे उपसरपंच भाऊलाल तरोणे,सेवा सहकारी संस्थेचे सदस्य शरद लांजेवार,ओमप्रकाश पटले,माजी ग्रा.प.सदस्य योगेश गायधने,ग्रा.प.सदस्य शेखर किरणापूरे,भरत बानेवार,अरुण बानेवार,देवराम गायधने,कमलाकर तयकर,कोळसिंग बिसेंन,माधोराव आंबेडारे,हनसराम मलगाम,श्री.पळसमोळे आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत स्व.ब्रिजलाल कटरे हायस्कूल शहारवानी प्रथम



**गोरेगावः–** राज्य शासनाच्या वतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा टप्पाक्र.२ अभियान राबविण्यात येत असून या स्पर्धात्मक अभियानात खाजगी व्यवस्थापनामध्ये स्व.ब्रिजलाल कटरे हायस्कूल शहारवानीने गोरेगांव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या अभियानाच्या माध्यमातून शाळेने अधिक प्रभावी विस्तार होण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा, शासन अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यासोबतच अध्ययन, अध्यापन, प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख, अंगभूत कला–क्रीडा गुणांचा विकास , शासकीय योजनांचा लाभ,इत्यादी अशा अनेकविध घटकांचा व उद्दिष्टांवर काम करत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.त्याबाबत सहाय्यक गटविकास अधिकारी गौतम,पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी एम.डी.पारधी, विस्तार अधिकारी श्री.बिसेन, श्री.बोपचे, केंद्रप्रमुख श्री.बिसेन,साधनव्यक्ती श्री.बहेकार, श्री.ठाकरे, कवलेवाडा द्रपरमुख मंजू वैष्णव, संस्थेचे अध्यक्ष एड.टी.बी. कटरे, सचिव यू.टी.बिसेन यांनी शाळेचे अभिनंदन केले आहे.तसेच

"मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमाच्या यशस्वीतेकरीता सरपंच सचिन मेश्राम,उपसरपंच तुकाराम गौतम,पोलीस पाटील तेजलाल पटले,तंटामुक्ती अध्यक्ष सुरेश नेवारे, सेवा सहकारी अध्यक्ष माणिकलाल गौतम,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हेमलताताई भगत, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष श्रीमती पटले, मातापालक संघ उपाध्यक्ष श्रीमती डोंगरे, श्रीमती कटरे, श्रीमती तुरकर, श्रीमती पटले, माजी विद्यार्थी, पालक वृंद, ग्रामवासी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी विशेष परिश्रम घेतले आहे. याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक आर.वाय.कटरे यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आभार मानले आहे.

## सडक अर्जुनी-कोहमारा मार्गावर विनंती थांबा केव्हा होणार?



**सडक अर्जुनी:** सडक अर्जुनी ते कोहमारा या तीन किलोमीटर अंतरामधील आर.के.पेट्रोल पंपाजवळ नगरपंचायतच्या आरक्षित जागेत विनंती थांबा देण्याची मागणी मागील तीन वर्षापासून केली जात आहे. मात्र याकडे अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे स्पशेल दुर्लक्ष. यामुळे येथे विनंती बसथांबा केव्हा होणार? असा सवाल सडक अर्जुनीवासी करीत आहेत.

कोहमारा–सडक अर्जुनी मार्गाच्या मधोमध नगरपंचायतची आरक्षित जागा आहे व त्या ठिकाणी बसेसचा विनंती थांबा देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात होती. गेल्या तीन वर्षापुर्वी पेट्रोल पंपाजवळ गोंदिया व नागपूरकडे जाणाऱ्या बसेस थांबत होत्या. पण कोणत्या कारणाने तो थांबा बंद करण्यात आला. हे मात्र कळू शकले नाही. हा विनंती थांबा बंद केल्यामुळे येथील नागरिकांना दीड किलोमीटर पायी परिसरातील कॉलनीत जावे लागते.

गेल्या दोन वर्षापासून पेट्रोल पंपच्या बाजूला आरक्षित जागा असा फलक लावून ठेवला आहे. मात्र त्या जागेचा उपयोग होत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पेट्रोल पंप परिसरात शिक्षक कॉलनी, प्रगती कॉलनी, राजीव गांधी महाविद्यालय परिसर, न्यू कॉलनी, एच अॅड.टी.कॉलेज परिसर, को–ऑपरेटिव्ह बँक, भारतीय स्टेट बँक, रवि नंदा हायस्कूलमध्ये हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी ये–जा करतात.

नगर पंचायत अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी लक्ष देऊन पेट्रोल पंपाजवळील आरक्षित जागेत बसथांबा देण्याची मागणी कॉलनीवासीयांनी केली आहे. नगरपंचायतची आरक्षित जागा असल्यामुळे तेथे बस निवारा निर्माण करुन बसथांबा देण्याची गरज आहे. अशात आता नवनिर्वाचित खासदार प्रशांत पडोळे, आमदार मनोहर चंद्रीकापुरे यांनी लक्ष देऊन सडक अर्जुनी–कोहमारा मार्गातील विनंती थांबाची सुविधा करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई

## ग्रामीण व गंगाझरी पोलिसांची कारवाई, तंबाखू,बिडी सिगारेट आदी केले जप्त

**गोंदिया:** शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली असून ग्रामीण व गंगाझरी पोलिसांनी तिघा विक्रेत्यांवर धाड घालून त्यांना दणका दिला. शनिवारी (दि.२१) पोलिसांनी ग्राम तुमखेडा खुर्द, गंगाझरी व मजीतपुर येथे या कारवाया केल्या असून विक्रेत्यांकडील तंबाखू पुड्या, सिगारेट, बिडी आदी जप्त केले आहे.

यामध्ये ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम तुमखेडा खुर्द येथील शाळेच्या परिसरात आरोपी बाबुलाल सेवकराम बांगरे (५५) हा तंबाखू, बिडी, पान मसाला, खर्रा इत्यादी साहित्य विक्री करीत होता. पोलिस हवालदार देवाजी बहेकार यांनी शनिवारी (दि.२१) सायंकाळी ७ वाजता धाड घालून त्याच्याकडील माल जप्त केला. आरोपीवर ग्रामीण पोलिसांनी सिगारेट व अन्य तंबाखू जन्य उत्पादने कायदा कलम ६ (ब) २४




अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी कारवाई गंगाझरी पोलिसांनी केली असून गंगाझरी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या २०० मीटरच्या आत तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या रामकृष्ण मोतीराम आंबेडारे (४९, रा.मजीतपूर) हा तंबाखूजन्य पदार्थ विक्री करीत असल्याने धाड टाकण्यात आली. शनिवारी (दि.२१) दुपारी २ वाजता दरम्यान करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिस हवालदार राकेश भुरे यांनी तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले. आरोपीवर सिमारेट व तंबाखू अन्य उत्पादने कायदा कलम ६ (ख) २४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले आहे. तपास पोलिस हवालदार श्यामकुमार देशपांडे करीत आहेत.

तर तिसरी कारवाई ग्राम मजीतपुर येथील शाळेच्या ७० मीटरच्या आत शनिवारी दुपारी ३ वाजेदरम्यान करण्यात आली असून आरोपी अनिल सदाराम बत्रा (४२, रा. गोंदिया) याच्याकडून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. पोलिस हवालदार राकेश भुरे यांनी धाड घालून ही कारवाई केली असून आरोपीवर सिगारेट व तंबाखू उत्पादने कायदा कलम ६ (ख), २४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### जिल्ह्यात कारवाई करण्याची आहे गरज

**तिरोडा पोलिसांनी शाळा परिसरातील पानठेल्यांवर कारवाई करुन तेथून मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थ जप्त केले होते. त्यानंतर आता गंगाझरी व ग्रामीण पोलिसांनी धाडसत्र सुरु केले आहे. मात्र ही कारवाई अवघ्या जिल्ह्यातच पोलिसांनी करण्याची गरज आहे.**

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराची शासनाकडुन घोषणा!,१४ आक्टोंबरपर्यंत पुरस्कारासाठी अर्ज

- मंत्री छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्याला अखेर यश
- सहा महसुली विभागातील सहा समाजसेवी महिलांना मिळणार प्रत्येकी १ लाखाचा पुरस्कार
- उच्च शिक्षण संचालकांनी मागीतले १४ आक्टोंबरपर्यंत पुरस्कारासाठी अर्ज



**गोंदियाः–** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य हे ऐतिहासिक असुन, अनेकांना प्रेरणा देणारे आहे. यातुनच राज्यातील अनेक महिला प्रेरणा घेवुन मुलींचे शिक्षण, समाजसेवा, महिलासक्षमीकरण यात निरपेक्षपणे कार्य करीत असतात. त्यांचेसाठी राज्य शासनाने १९८१ साली सावित्रीबाई फुले पुरस्कार सुरू केला होता. पण काही कारणामुळे तो २०१३ पासुन बंद झालेला होता.

यासाठी अनेक समाजसेवी संघटना आणि महात्मा फुले समता परीषदेचे उपाध्यक्ष व महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे तसेच चळवळीतील कार्यकर्त्यांनी राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांना साकडे घालुन हा पुरस्कार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या नावानी पुन्हा सुरू करून, त्यातील पुरस्काराची रक्कम ही सहा महसुली विभागातील निवडलेल्या सहा महिलासाठी प्रत्येकी १ लाख करण्यात यावी, अशी विनंती केली होती.

याबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना पत्र देवुन, पुन्हा नव्याने हा पुरस्कार सुरू करण्याची मागणी करीत त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. शेवटी शासनाने १६ जानेवारी व २ फेब्रुवारी २०२४ ला शासन निर्णय काढुन सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले या नावाने, प्रति एक लाख पुरस्कार व प्रशस्तीपत्र देण्याचे जाहीर केले.

त्यानुसार आता उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यातील सहाही महसुली विभागामधुन प्रत्येकी एका सामाजिक कार्यकर्त्या महिलेची निवड करण्यासाठी १४ आक्टोंबर २०२४ पर्यंत अर्ज मागीतले आहे. या पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी किमान ५० वर्षे वयोमर्यादा, तसे पोलीस पडताळणी अहवाल मागीतला असुन, शिक्षक किंवा नोकरदार महिलांना यासाठी अर्ज करता येणार नाही.

अर्जासोबत, महिला कार्यकर्त्यांनी त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक कार्य, महिला सक्षमीकरण,स्त्री शिक्षण, सामाजिक परीवर्तन, महिलांचे स्वयरोजगार, वृध्द व निराधार महिलांसाठी वृध्दाश्रम, अनाथ बालकांसाठी अनाथालय, महिलांसाठी बचत गट स्थापन करणे, महिलांना स्वावलंबी बणविणे ईत्यादी केलेल्या कार्याचा तपशील पुराव्यासहीत जोडावयाचा आहे.

या पुरस्कारासाठी शासनाने निवड समिती तयार केली असुन, ही समिती राज्यातील सहाही महसुली विभागामधुन, सहा पुरस्कार्थी महिलांची निवड करणार आहेत. जर अर्ज आले नाहीत, किंवा पात्र व्यक्तींचे अर्ज नसेल, तर या निवड समितीला, राज्यात शोध घेवून, योग्य व सन्माननीय पात्र महिलांना या पुरस्कारासाठी नामनिर्देशीत करून, पुरस्कारासाठी शिफारस करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तसेच हा ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कार हा ज्ञानज्योतीचे जन्मग्राम नायगाव जि.सातारा येथे, ३ जानेवारीला शासनाच्या महिला मुक्तीदिन सोहळ्यात देण्याचे नियोजन आहे.

तरी राज्यातील सहाही महसुली विभागातील महिला कार्यकर्त्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी १४ आक्टोंबर२०२४ च्या आत, संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी शिवाजी नगर पुणे ४११०१६ या पत्यावर व्यक्तीश: किंवा पोस्टाव्दारे, अर्ज सादर करावा, असे आवाहन, महाज्योतीचे माजी संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी केले आहे.

## उपराष्ट्रपतींच्या हस्ते संविधान मंदिराचे ऑनलाईन उद्घाटन

**देवरी:** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था देवरी येथे १५ सप्टेबर रोजी उपराष्ट्रपती जगदिप धनखड यांच्या हस्ते राज्यातील प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दुरदृश्य प्रणालीद्वारे संविधान मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारतीय संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींना सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविण्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिराची स्थापना करण्यात आली. एन.ए.सोळंके, एस.एस.कराड, डी.आय.राऊत, एल.के.गजभिये, एन.ए.राऊत यांनी परिश्रम घेतले.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया**

**निविदा सुचना क्र.१५ सन २०२४-२०२५ (प्रथम मागणी)**

गोंदिया पाणी पुरवठा योजना,(देखभाल व दुरुस्ती)ता.जि.गोंदिया अंतर्गत **हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्र** येथे Tool and Fire Fighting Equipment's ive चा पुरवठा करणेबाबतच्या कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची **अंदाजित किंमत** रू.९४,०६८/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक २७/०९/२०२४ ते दिनांक ११/१०/२०२४ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**

जिमाका/गोंदिया/जाहिरात/२०२४/५८

# जिल्ह्यात आढळले शाळाबाह्य २० मुले

## मिशन ड्रॉप आऊट; स्थलांतरीत बालकांनाही मिळाला शाळांत प्रवेश विद्यार्थ्यांच्या हाती आली पाटी-पेन्सिल



**गोंदिया:** शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला मोफत प्राथमिक शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. असे असले तरी अशिक्षीत आई-वडील, घरची बिकट परिस्थिती अशा विविध कारणांमुळे अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित राहतात. मात्र, प्राथमिक शिक्षण संचालकांच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षणामुळे यावर्षी २० बालकांच्या हाती पाटी-पेन्सिल असल्याचे सकारात्मक चित्र आहे,

दरवर्षी साधारणपणे जुलै महिन्यात शिक्षण विभागाच्या माध्यमातून शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करुन अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाते. त्यासाठी व्यापक प्रमाणात मोहीम राबविली जाते. यात जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, महसूल विभाग अशा विविध यंत्रणांच्या माध्यमातून विविध कारणांमुळे शााळाबाह्य बालकांचा शोध घेतला जातो. यामध्ये विशेष करुन विविध प्रकारच्या कामानिमित्त कामगारांचे वेगवेगळ्या ठिकाणी झालेले स्थलांतरण, वीटभट्टी कामगारांची ठिकाणे, रेल्वे स्थानक, बसस्थानक, सिग्नवरील भीक मागणारी बालके अशा सर्वच ठिकाणी मुलांचा शोध घेऊन त्यांना जवळच्या शाळेत, तर काही बाबतीत शासकीय वसतिगृहे अशा ठिकाणी ठेवून या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाते. चालू शैक्षणिक वर्षात जिल्हा व तालुक्यात स्थानिक यंत्रणांच्या माध्यमाने अनियमित व स्थलांतरीत बालकांच्या नोंदी घरोघरी जावून घेण्यात आल्या. ५ ते २० जुलै दरम्यान राबविण्यात आलेल्या सर्वेक्षणात २० बालकांना शोधून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आले. त्याचप्रकारे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातून २८ बालके स्थलांतरीत होवून बाहेर गेली. तर ३९ बालके जिल्ह्यात स्थलांतरीत होवून आल्याची माहिती शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली.

| तालुका | अंगणवाडीत दाखल | शाळाबाह्य | स्थलांतरित झालेले | स्थलांतर होवून आलेले |
|---|---|---|---|---|
| आमगाव | 16089 | 00 | 03 | 11 |
| अर्जुनी मोरगाव | 31474 | 00 | 02 | 00 |
| देवरी | 28153 | 00 | 09 | 01 |
| गोंदिया | 74790 | 00 | 00 | 10 |
| गोरेगाव | 25095 | 04 | 01 | 02 |
| सडक अर्जुनी | 25891 | 00 | 05 | 00 |
| सालेकसा | 19472 | 01 | 06 | 07 |
| तिरोडा | 31802 | 15 | 02 | 08 |
| एकूण | 252766 | 20 | 28 | 39 |

### मिशन झिरो ड्रॉप आऊट प्रभावी

**ज्या बकलांनी शाळाच पाहिली नाही. अशा शाळेत प्रवेशित करण्यासाठी तसेच एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीत वर्गात गैरहजर राहिल्याने मुले शाळाबाह्य झाली आहेत. अशांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मिशन झिरो ड्रॉप आऊट राबविण्यात आले. शासकीय यंत्रणेतील सर्व घटकांच्या सहकार्याने राबविलेले हे मिशन अंतर्गत तालुका, केंद्र, गावस्तर समिती सदस्यांना प्रभातफेरी, दवंडी, ग्रामसभा, पथनाट्य व विविध जनजागृतीच्या उपक्रमातून ज्या मुलांनी शाळाच पाहिली नाही किंवा कोणत्याच वर्गात प्रवेश घेतला नाही. अशा ६ ते १४ वयोगटातील मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून प्रोत्साहित केले जाते. हे मिशन प्रभावी ठरत असल्याचे निरीक्षण शिक्षण विभागाने नोंदविले. शाळाबाह्य मुलांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण अचूक आणि ज्या ठिकाणी अधिक गळती अथवा शिक्षणाविषयी अनास्था असणाऱ्या समाजघकांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**

# प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानातून जिल्ह्यातील १०४ आदिवासी गावांचा होणार कायापालट



**गोंदिया :** केंद्रीय मंत्रीमंडळाने प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानास मंजुरी प्रदान केलेली असून दुर्गम व अति दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यातील ४ हजार ९६७ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील आठ तालुक्यातील १०४ आदिवासी गावांचा समावेश असून, आदिवासी बांधवांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र व राज्य सरकारकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली होती. १८ सप्टेबरला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत या अभियानाला मंजुरी देण्यात आलेली आहे. या अभियानाचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. पीएम-जनमन अभियानात १७ संलग्न असलेल्या मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याद्वारे सामाजिक पायाभुत सुविधा, आरोग्य, शिक्षण, अजीविका यामधील तफावत भरुन काढण्याचा प्रयत्न असणार आहे. तसेच आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे.

### जिल्ह्यांना मिळणार पुरस्कार

**प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात सहभागी प्रत्येक मंत्रालयवर पुढील पाच वर्षात निश्चित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुसूचित जमातींचा विकास कृती आराखडा तयार करुन उपलब्ध निधीद्वारे त्यांच्याशी संबंधीत योजना कालबध्द पध्दतीने कार्यान्वीत करण्याची जबाबदारी असणार आहे. दरम्यान या अभियानांतर्गत समाविष्ट असलेली आदिवासी गांवे पीएम गतीशक्ती पोर्टलवर संबंधीत विभागाद्वारे त्यांच्या योजनेतून मॅप केल्या जातील. पोर्टलचे भौतिक आर्थिक प्रगतीचे परीक्षण केले जाईल. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.**

**दुर्गम व अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. यात गोंदिया जिल्ह्यातील आठ तालुक्यातील १०४ आदिवासी गावांचा समावेश आहे. पीएम-जनमन अभियानात १७ मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. प्राप्त निधीमधून आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे. यात आदिवासी समाजाचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे.**

**-उमेश काशिद, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प देवरी**

# ७२ वसतिगृहांसाठी ५० ओबीसी विद्यार्थ्यांनी केले उपोषण

## १ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा




**नागपूर:** ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन अशी राज्यात एकुण ७२ वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. परंतु सहा वर्षे लोटूनही एकही वसतिगृह सुरु झाले नाही. त्यामुळे ही वसतिगृहे तातडीने सुरु करण्यासाठी रविवारी ५० ओबीसी विद्यार्थ्यांनी उपोषण करीत शासनाचे लक्ष वेधले. यासोबतच ओबीसी समाजाच्या इतरही मागण्या करण्यात आल्या. या मागण्या मान्य न झाल्यास येत्या १ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

ओबीसी युवा अधिकार मंच अंतर्गत करण्यात आलेल्या या आंदोलनादरम्यान ७२ वसतिगृहे तत्काळ सुरु करण्यासह, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी राजेंद्र भुजाडे यांचे निलंबन रद्द करुन त्यांना सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग या पदावर पूर्ववत करावे, महाज्योती संस्थेच्या पीएचडीसाठी पात्र सर्व विद्यार्थ्यांना सरसकट नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्ती द्यावी, २०१९ ते २०२४ शैक्षणिक सत्राच्या लाखो ओबीसी विद्यार्थ्यांची ७५० कोटी रुपयांची प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती सर्व पात्र विद्यार्थ्यांना तत्काळ अदा करावी आणि ओबीसी विद्यार्थ्यानसाठी महाराष्ट्रातील सर्व महसूल विभागाच्या ठिकाणी एक हजार मुले व एक हजार मुली असे स्वतंत्र वसतिगृहे सुरु करण्यात यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात ओबीसी युवा अधिकार मंचचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम, आमदार अभिजीत वंजारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे सलील देशमुख, दुनेश्वर पेठे, ईश्वर बाळबुधे, वंदना वनकर, ओबीसी जनमोर्चाचे रमेश पिसे, युवा ग्रॅज्युएट फोरमचे अतुल खोब्रागडे, आकाश वैद्य, पियुष आकरे, सकल कुणबी समाजाचे राजेश काकडे, संघर्ष वाहिनीचे दीनानाथ वाघमारे, धीरज भिसीकर, देवेंद्र समर्थ, कृतल आकरे, गोविंद सूर्यवंशी, नयन काळबांडे, पल्लवी समर्थ, जानबा मस्के, रामेश्वर हिंगरूपे, उमेश सोळखे उपस्थित होते.

# बॅरिकेट्स काढून फेकत जड वाहने सुसाट, मात्र बस सेवा बंदच

## आमगाव-सालेकसा मार्गावर समस्या कायम, जिल्हा प्रशासनाने केले दुर्लक्ष

**सालेकसा:** आमगाव-सालेकसा मार्गावरील वाघ नदीवर असलेला पूल धोकादायक झाल्याने पुलाच्या दोन्ही बाजूला बॅरिकेट्स लावून जड वाहनांची वाहतूक बंद केली होती. परंतु पर्यायी व्यवस्था नसल्याने वाहनचालकांनी बॅरिकेट्स काढून फेकले आहेत. त्यामुळे आता धोकादायक पुलावरुन जड वाहनांची सुसाट वेगाने ये-जा सुरु झाली आहे. तर दुसरीकडे अति आवश्यक असलेली बस सेवा अजूनही बंद असून, सालेकसा तालुका मुख्यालयाकडे सातगाव तिरखेडी मार्गावरुन २५-३० किलोमीटर अंतरावरील फेरी पूर्ण केल्यानंतर बस पाठविली जाते. या मार्गावरील प्रवाशांना होणारा त्रास कायम आहे.



व्हीएनआयटी कंपनीने २०१६ मध्येच आमगाव-सालेकसा राज्य महामार्ग-३३५ वरील पूल क्रमांक २३८-२०५ चे स्ट्रक्चर ऑडिट केले होते. अहवालाच्या आधारे हा पूल धोकादायक असल्याने तातडीने वाहतूक बंद करण्यास सांगितले होते. मात्र, यानंतरही या पुलावरुन अवजड वाहने सातत्याने धावत असल्याने सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिधिंनी जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एक पत्र जारी करुन सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी विभाग, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस निरीक्षक, पोलीस परिवहन विभाग यांच्या मदतीने पुलावरुन अवजड वाहनांची वाहतूक तत्काळ बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पुलाच्या दोन्ही बाजूने सुमारे साडेआठ फूट उंचीचे बॅरिकेट्स लावण्यात आले. यानंतर पुलावरुन दुचाकी व चारचाकी वाहनांची वाहतूक सुरु होती. मात्र, सालेकसाकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला. अशातच वाहन चालकांनी हे बॅरिकेट्स तोडल्यानंतर अवजड वाहने धावू लागली आहेत.

### महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ

**मुंबई:-** महाज्योतीच्या पात्र विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून शंभर टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ अदा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाने बार्टीच्या धर्तीवर सारथी व महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून शंभर टक्के अधिछात्रवृत्ती मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडला होता. प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मंजूरी दिली असून इतिवृत्त मान्यतेची वाट न पाहता यासंबंधीचा शासन निर्णय तात्काळ निर्गमित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बार्टीप्रमाणे सारथी व महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनाही आता नोंदणी दिनांकापासून शंभर टक्के अधिछात्रवृत्ती मिळणार असल्याने संबंधित विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून या विद्यार्थ्यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांचे त्याबद्दल आभार मानले आहेत.

# शिक्षक संच मान्यता, कंत्राटी भरती विरोधात, २५ सप्टेंबरला शिक्षकांचे सामूहिक रजा आंदोलन



### सर्व शिक्षक संघटना आंदोलनाकरीता एकवटल्या

**गोंदिया:-** राज्यात सुधारीत शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. याला राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी कडाडून विरोध होत आहे. ही अंमलबजावणी सुरू झाल्यास राज्याच्या ग्रामीण भागातील १ लाख ८५ हजार विद्यार्थी आणि २९ हजाराहून अधिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

शासनाने हे दोन्ही निर्णय रद्द करावेत यासाठी राज्यभरातील सर्व शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. जिल्ह्यात २५ सप्टेंबर २०२४ ला जिल्हाधिकारी कार्यालयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (नविन प्रशासकिय ईमारती समोर) ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत बाईक रैली काढून महामोर्चात रुपांतर करण्यात येणार आहे.सर्व शिक्षक संघटनांचे सभासद,पदाधिकारी,प्रतिनिधी समुह शिक्षक कृती महासंघ जिल्हा गोंदियाच्या आव्हानाला स्विकारुन महामोर्चा आंदोलनात श्रेय वादाला बाजुला सारुन सर्व शिक्षक बंधु भगिंनी पालकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शाळांचा दर्जा घसरून त्या बंद पडण्याची भीती

**नवीन धोरणानुसार २० किंवा त्यापेक्षा कमी पट असलेल्या शाळांवर केवळ एकच कायम शिक्षक दिला जाणार असून त्यासोबत सेवानिवृत्त शिक्षकाची कंत्राटी पद्धतीने नेमणूक केली जाणार आहे. यामुळे शाळांचा दर्जा घसरून त्या बंद पडण्याची भीती शिक्षक संघटनांनी व्यक्त केलीय. शिक्षक कृती महासंघ गोंदिया जिल्हयाची बैठक नुकतीच शिक्षक पतसंस्थेच्या कार्यालयात पार पडली. यात सोमेश्वर वंजारी, संदिप तिडके, प्रमोदकुमार बघेले,हरिराम येरणे, मोरेश्वर सुर्यवशी आदी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.**

### काय आहे सरकारचा निर्णय

**राज्यातील वीस व वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या सरकारी शाळांमध्ये आता कंत्राटी तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. निवृत्त शिक्षकांसह डीएड, बीएड अर्हताधारकांची नियुक्ती अशा शाळांमध्ये करण्याचा निर्णय राज्य शासनाने गुरुवारी घेतला. यावरुन आता वाद होण्याची शक्यता असून हे, आरटीई कायद्याचे उल्लंघन करणारा निर्णय असल्याचे पात्रताधारकांचे म्हणणे आहे. निर्णयाविरोधात न्यायालयातही दाद मागण्याची तयारी केली जात आहे. कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या १५ हजारांपर्यंत आहे. अशा शाळांमध्ये कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती होणार आहे. दरमहिना १५ हजार रुपये मानधनावर ही नियुक्ती केली जाणार आहे. निवृत्त शिक्षकांच्या नियुक्तीबाबत यापूर्वी निर्णय घेण्यात आला होता. त्यात आता डीएड, बीएड पात्रताधारकांचाही समावेश करण्यात आला आहे.**

# मागणी १४० रुपयांची, मंजूर केले केवळ ४० रुपये

## धान भरडाई दरात वाढ, राईस मिलर्समध्ये नाराजी

**गोंदिया:** शासकीय धान भरडाईच्या दरात शासनाने ४० रुपये वाढ करण्याचा निर्णय सोमवारी (दि.२३) पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत केला. मात्र, या निर्णयामुळे राईस मिलर्समध्ये नाराजीचा सुर आहे. राईस मिलर्सने १४० प्रतिक्विंटल भरडाई दर देण्याची मागणी केली होती. पण शासनाने केवळ ४० रु.दरात वाढ केल्याने धानाची भरडाई करण्याची कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यात पूर्व विदर्भात सर्वाधिक धानाचे उत्पादन घेतले जाते. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी शासन जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून शासकीय धान खरेदी केंद्रावरुन हमीभावाने धान खरेदी करते.यानंतर धान खरेदी केंद्रावर खरेदी केलेल्या धानाची राईस मिलर्ससह करार करुन धानाची भरडाई करुन सीएमआर तांदुळ शासनाकडे जमा केला जातो. राईस मिलर्सला प्रति १ क्विंटल धानामागे भरडाई करुन ६७ क्विंटल तांदूळ शासनाकडे जमा करावा लागतो. तर १ क्विंटल धानाच्या भरडाईसाठी ५० रुपये खर्च येतो. पण भरडाईदरम्यान तांदळाचा तुकडा कमी येतो.

त्यामुळे तांदळाची उतारी ही ५० ते ५५ किलोच्यावर जात नाही. परिणामी राईस मिलर्सला नुकसान सहन करावे लागते. त्यामुळेच राईस मिलर्सकडून धानाच्या प्रतिक्विंटल भरडाईचे दर १४० रुपये देण्याची मागणी केली जात होती. तसेच १४० रुपये दर का हेसुद्धा राईस मिलर्सने शासनाकडे पत्रव्यवहार करुन पटवून दिले होते. मात्र यानंतरही शासनाने सोमवारी पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत केवळ ४० रुपये वाढ केली. त्यामुळे आता राईस मिलर्सला प्रतिक्विंटलमागे भरडाईसाठी ५० रुपये मिळणार आहे. मात्र, यानंतर राईस मिलर्सला नुकसान होणार असल्याने या निर्णयाने राईस मिलर्समध्ये नाराजीचा सुर आहे.

### ११ वर्षापासून भरडाई दरात वाढीची मागणी

**लगतच्या मध्यप्रदेशात शासकीय धानाचा प्रतिक्विंटल भरडाईचा दर २०० रुपये, तर छत्तीसगडमध्ये १३० रुपये प्रतिक्विंटल आहे. मात्र, केवळ महाराष्ट्रातच प्रतिक्विंटल भरडाईचा दर ५० रुपये दिला जातो. या दरात वाढ करण्यात यावी यासाठी राईस मिलर्स असोसिएशनच्या माध्यमातून गेल्या ११ वर्षापासून पाठपुरावा सुरु आहे. पण शासनाने अद्यापही १४० रुपये प्रतिक्विंटल दर दिला नाही.**

### त्यामुळे तांदळाच्या गुणवत्तेवर परिणाम

**भरडाईदरम्यान तांदळाची उतारी ५० ते ५५ किलो येत आहे. तर शासनाला प्रतिक्विंटलमागे ६७ क्विंटल तांदूळ जमा करावे लागत आहे. भरडाई दर कमी असल्याने व तूट अधिक असल्याने त्यात बाहेरुन तांदूळ खरेदी करुन तुट भरली जात आहे. यामुळे तांदळाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची माहिती आहे.**

### पर्याय नसल्याने भरडाई

**गेल्या सात-आठ वर्षापासून पूर्व विदर्भातील राईस मिल उद्योग डबघाईस आला आहे. त्यामुळे शासकीय धानाची भरडाई हाच एकमेव उत्पन्नाचा स्त्रोत राईस मिलर्सला आहे. त्यामुळे परवडत नसले तरी ते धानाची भरडाई करीत असल्याची माहिती आहे.**

**राईस मिलर्स असोसिएशनच्या माध्यमातून धानाचा प्रतिक्विंटल भरडाईचा दर १४० रुपये करण्यात यावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. पण त्याची अद्यापही दखल घेण्यात आली नाही. सोमवारी शासनाने भरडाई दरात ४० रुपयांनी वाढ करुन राईस मिलर्सच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे.**

**अशोक अग्रवाल, अध्यक्ष विदर्भ राईस मिलर्स असोसिएशन**

# मुरुगानंथन यांनी दिली प्राथमिक आरोग्य संस्थाना आकस्मिक भेट

## संस्थामधील कामकाजाची केली पाहणी, खमारी व ठाणा येथे केले मार्गदर्शन



**गोंदिया:** जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानथंम यांनी शनिवारी (दि.२१) आरोग्य संस्थांना आकस्मिक भेट देऊन आरोग्य संस्थेतून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा व सुविधांची पाहणी केली. एवढेच नव्हे, तर प्राथमिक आरोग्य केंद्र ठाणा व खमारी येथे त्यांनी मार्गदर्शनही केले.

भेटीदरम्यान मुरुगानथंम यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आत व बाहेरील परिसराची स्वच्छता, बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) दरम्यानच्या वेळेत मिळत असलेल्या रुग्ण सुविधा, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे नियमित गावनिहाय भेटीचे नियोजन, पर्यवेक्षकांची उपकेंद्रांना भेट, सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा, औषध साठा, शासकीय निवासस्थान आदी विविध बाबींचा आढावा घेतला. तसेच मुख्यालयी राहणे, रुग्णसुविधा गुणवत्तापूर्वक देणे, सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्यात यावी, कर्मचाऱ्यांनी कर्तव्यस्थानी ओळखपत्र व ड्रेस कोड नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, आरोग्य संस्थांचे रेकॉर्ड अद्ययावत करुन मुख्यालयी राहण्याच्या सूचना यावेळी दिल्या.

तसेच ठाणा येथे आशा सेविकांच्या सभेत त्यांनी आशांनी लोकांना गुणवत्तापूर्वक सेवा देऊन गरोदर माता व बालकांचा गृहभेटीत नियमित फॉलोअप घेऊन शासनाच्या सर्व योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश दिले, तर खमारी येथे मानव विकास शिबिरादरम्यान गरोदर माताशी हितगुज करुन देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती जाणून घेतली. आरोग्य संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गृहभेटीत संशयित लक्षणे असलेल्या लोकांची तपासणी करुन जलद तपासणी व उपचार करुन आरोग्य शिक्षण जनजागृतीवर प्राधान्य देणे गरजेचे म्हटले आहे. अतिजोखमीच्या लोकांची यादी बनवून त्यांना प्राधान्याने नियमित भेटी देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

भेटी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी येथे वैद्यकीय अधिकारी डॉ.खुशबू शर्मा, आरोग्य सहायक गजेंद्र तावाडे, जे.सी.साव, फार्मासिस्ट चिर्डे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी शकील शेख, आरोग्य सेविका माधुरी टेंभुरकर, शालू राऊत, लक्ष्मी राऊत, कनिष्ठ सहायद दहीकर, सफाईगार ठाकरे, परिचर रामटेके व कासरे उपस्थित होते. तर प्राथमिक अरोग्य केंद्र ठाणा येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन बारई उपस्थित होते.

# सरपंच व उपसरपंचांचे मानधन दुप्पट -ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन




**मुंबई :** सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट केले असून, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्याबाबत आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

मंत्री श्री.महाजन म्हणाले की, राज्यातील सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट करण्यात आले असून ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. ३००० वरुन रु. ६०००. तर उपसरंपचाचे मानधन १००० रुपये वरुन २००० रुपये करण्यात आले आहे. ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० ते ८००० पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. ४००० वरुन रु. ८०००. तर उपसरपंचाचे मानधन १५०० वरुन रु. ३००० करण्यात आले आहे.ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ८००० पेक्षा जास्त आहे त्या सरपंचाचे मानधन ५००० रु. वरुन १०,००० रु. तर उपसरपंचाचे मानधन २००० रुपये वरुन ४००० रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या मानधनवाढीपोटी राज्य शासनावर वार्षिक ११६ कोटी रुपयांचा आर्थीक भार येणार आहे.

मंत्री श्री.महाजन म्हणाले की, राज्यातील कार्यरत ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामविकास विभागाने राज्यातील ग्रामपंचायतींना १५ लाख रूपयापर्यंतची विकासकामे ग्रामपंचायत एजन्सी म्हणून करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न ७५ हजार रूपयांपर्यंत आहे त्या ग्रामपंचायतींना १० लाख रूपयांपर्यंतची. ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न ७५ हजारापेक्षा जास्त आहे त्या ग्रामपंचायतींना १५ रुपये लाखापर्यंतची कामे ग्रामपंचायत एजन्सी म्हणून करता येतील. या निर्णयाची अंमलबजावणी करताना १० लाखांच्यावरील कामाकरिता ई-निविदा पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.